cmyk

## संपादकीय

### ...तर भारतीय शेतकऱ्यांचा टिकाव लागणार नाही

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'अमेरिका फर्स्ट' धोरणांतर्गत इतर देशांसोबत 'जशास तसे' कर धोरण राबवण्याचा निर्णय घेतला असून रेसिप्रोकल टॅक्स आकारण्याची घोषणा केली. त्यांनी यासंबंधीच्या अध्यादेशावर स्वाक्षरी केली, त्यानुसार भारतीय मालावर २७ टक्के आयात शुल्क लागू करण्यात आले आहेत. चीनवर ३४ टक्के, व्हिएतनामवर ४६ टक्के, युरोपीय महासंघावर २० टक्के, बांगला देशवर ३७ टक्के तर थायलंडवर ३६ टक्के आयात शुल्क लागू करण्यात आले आहे. ट्रम्प यांनी जगभरातून आयात होणाऱ्या वस्तूंवर कर लादण्याचा आणि प्रमुख व्यापारी भागीदारांवर अतिरिक्त कठोर शुल्क लादण्याचा निर्णय घेतला आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### बुक माय शोने कुणाल कामराचे नाव कलाकारांच्या यादीतून हटवले

मुंबई : तिकिट बुकिंग प्लॅटफॉर्म बुक माय शोने स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराचे नाव आपल्या सेल आणि आर्टिस्टच्या यादीतून हटवले आहे. सोबतच कामराशी संबंधित सर्व कॉन्टेंट वेबसाईटवरून काढून टाकले आहे. वादग्रस्त गाणे तयार केल्याबद्दल स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरावर गुन्हा दाखल झाला. दरम्यान, तो पोलिसांच्या समन्सनंतरही मुंबई पोलिसांसमोर हजर झाला नाही. २ एप्रिलला त्याला तिसरे समन्स पाठवण्यात आले होते. आणि ५ एप्रिलला हजर राहण्यास सांगितले होते. एकनाथ शिंदे यांच्यावर विधान केल्यानंतर शिवसेना नेते राहुल कनाल यांनी ३ एप्रिलला पत्र लिहून त्याची तिकिटे विक्री न करण्याची मागणी केली होती. कामराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव न घेता टिप्पणी केली होती. आता बुक माय शो या ऑनलाईन प्लॅटफॉर्मने त्याच्याशी संबंधित सर्व कॉन्टेंट काढून टाकला असून, कलाकारांच्या यादीतूनही नाव हटवले आहे.

बीड – महाराष्ट्र | वर्ष –४ | अंक–३४१ | रविवार, दि.०६ एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### बच्चू कडू शिक्षक मतदार संघात लढणार

अमरावती–अमरावती विभाग शिक्षक मतदार संघातील विधानसभा निवडणूक बच्चू कडू लढणार आहे. त्यासाठी त्यांनी चाचपणी सुरू केली आहे. पाच जिल्ह्याचा हा मतदार संघ आहे. लोकांच्या मागणीमुळे ही निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

### शेतकरी विरोधी कायदे रद्द करावे लागतील–शेट्टी

कोल्हापूर–सरकारचे धोरण म्हणजे शेतकऱ्याचे मरण ठरलेले आहे. आता खऱ्या अर्थाने शेतकरी विरोधी जे कायदे आहेत ते आपल्याला रद्द करावे लागतील, असे राजू शेट्टी यांनी म्हटले आहे.

### शेतकरी दाम्पत्याची आत्महत्या

नांदेड–शेतकरी दाम्पत्याने आत्महत्या केल्याची घटना मुदखेड तालुक्यात समोर आली आहे. रोही पिंपळगावमधील ४० वर्षीय शेतकरी बाबासाहेब शिंदे आणि त्यांची ३५ वर्षीय पत्नी रुक्मिणीबाई शिंदे हे दाम्पत्य शुक्रवारी सकाळी आपल्या शेतात गेले होते. दुपारी एक वाजता शिंदे यांचा मृतदेह झाडाला लटकलेल्या अवस्थेत दिसून आला तर पत्नीचा मृतदेह तिथेच खाली पडलेला आढळून आला आहे. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. ◀◀ पान २ वर

# शेतकरी कर्जमाफी कृषी मंत्र्यांच्या घरातून नाही जनतेच्या पैशातून होते!

## काँग्रेसचा सरकारवर हल्लाबोल

मुंबई । प्रतिनिधी

**राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे नाशिक जिल्ह्यात झालेल्या पावसाने नुकसानीची पाहणी करण्यासाठी गेले होते. यावेळी नुकसानीची पाहणी करताना शेतकऱ्यांशी संवाद साधला. यादरम्यान कृषीमंत्री कोकाटेंनी शेतकऱ्यांवर संताप व्यक्त केला. त्यांनी कर्जमाफीवर वक्तव्य करत शेतकऱ्यांना कर्जमाफी शेतीत गुंतवणूक करण्यासाठी नाहीतर लग्न, साखरपुडे करण्यासाठी लागते असे अजब वक्तव्य त्यांनी केले. यावरून राज्यातील काँग्रेस नेत्यांकडून माणिकराव कोकाटेंच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शनिवारी (दि.०५) पत्रकार परिषद घेत जोरदार टीका केली. शेतकरी कर्जमाफी ही कोकाटेंच्या घरातील पैशाने होत नाही तर ती जनतेच्या पैशाने होते, असा हल्लाबोल काँग्रेसने केला.**

शेतकऱ्यांचा अपमान करण्याची संधी महायुती सरकार सोडत नाही. कृषीमंत्री



माणिकराव कोकाटेंना सत्तेचा माज चढल्याचा आरोप हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. ते पुढे म्हणाले की, ''कृषीमंत्री कोकाटे सातत्याने शेतकऱ्यांचा अपमान करत आहेत. शेतकऱ्यांना भिकारी म्हटल्यानंतर त्यांनी कर्जमाफीचे काय करता, लग्न, साखरपुडे करता, शेतीत गुंतवता का, असा अजब प्रश्न विचारून पुन्हा एकदा अपमान केला. शेतकऱ्यांचा अपमान करणाऱ्या ◀◀ पान २ वर

### कोकाटेंच्या वादग्रस्त विधानावर बावनकुळेंची माफी

कुठल्याही मंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळू नये, नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे काय बोलले, मला माहिती नाही. ते मी नंतर बघेन. मात्र, सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहे. शेतीचे पंचनामे करणे आणि शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी ही सरकारची आहे. मंत्री कोकाटे काही बोलले असतील, तर सरकार म्हणून मी शेतकऱ्यांची माफी मागतो, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे नागपूर येथे म्हणाले.

### घरकूल बांधकामासाठी पन्नास हजार रुपयांचे वाढीव अनुदान

पुणे । प्रतिनिधी

**केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकूल बांधकामासाठी आता लाभार्थींना ५० हजार रुपये वाढीव अनुदान मिळणार आहे. पूर्वीच्या एक लाख २० हजार रुपयांच्या अनुदानात ५० हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय ग्रामविकास विभागाने घेतला आहे. त्यातील १५ हजार रुपये घरावर सौरउर्जा यंत्रणा उभारणीसाठी असणार आहेत.**

मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाअंतर्गत १० एप्रिलपर्यंत एक लाख ६० हजार ५४४ घरकुले बांधून पूर्ण होणे अपेक्षित आहेत. पण, अनुदान कमी, मोफत वाळू मिळत नसल्याने व बांधकाम साहित्य महागल्याने ५० टक्के लाभार्थींची घरे अजूनही अपूर्णच असल्याबद्दल नाराजी व्यक्त होत होती. त्यावर ग्रामविकास विभागाने वाढीव अनुदानाचा शासन निर्णय काढला आहे. राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकूल योजनेतील लाभार्थींनाही वाढीव अनुदान मिळणार आहे. केंद्र सरकारच्या अनुदानाशिवाय ही राज्य हिश्शातील वाढीव रक्कम असणार आहे. या निर्णयामुळे अपुऱ्या अनुदानामुळे थांबलेली घरकुले पूर्ण होतील, अशी आशा आहे. घरकूल लाभार्थींना आता मूळ अनुदान एक लाख २० हजार रुपये, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून ९० दिवसांच्या मजुरीपोटी ◀◀ पान २ वर

# धनंजय मुंडेंना मोठा धक्का; पोटगीचा निकाल कायम

## माझगाव सत्र न्यायालयाचा निकाल; करुणा शर्मांच्या त्या कागदपत्रांमुळे शिक्कामोर्तब



मुंबई । प्रतिनिधी

**माझगाव सत्र न्यायालयानं धनंजय मुंडे यांना मोठा धक्का दिला आहे, न्यायालयाकडून करुणा शर्मा यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवर शिक्कामोर्तब करण्यात आले असून, धनंजय मुंडे यांची याचिका फेटाळण्यात आली आहे. करुणा शर्मा यांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे ही याचिका फेटाळली असून धनंजय मुंडेंच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.**

करुणा शर्मा यांना दोन लाखांची पोटगी देण्याचा निर्णय कायम ठेवण्यात आला आहे. हा मुंडेंसाठी मोठा धक्का मानला जात आहे. शनिवारी झालेल्या

**इच्छापत्र अन् स्वीकृतीपत्र**

शनिवारी करुणा शर्मा यांनी स्वत: युक्तीवाद केला. तसेच धनंजय मुंडे यांची पत्नी असल्याचा पुरावा म्हणून दोन महत्वाचे कागदपत्रे दिली. त्यात धनंजय मुंडे यांचे अंतिम इच्छापत्र आणि स्वीकृती पत्र होते. स्वीकृती पत्रात माझ्या घराच्या दबावापोटी मी लग्न करत आहे. पण करुणा मुंडे यांचा सांभाळ करणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले होते. हे सर्व पुरावे तपासल्यानंतर वांद्रे कोर्टाचा निकाल माझगाव न्यायालयाने कायम ठेवला.

**प्रेमात अडवणाऱ्याला २० कोटी**

१९९६ साली मला हिरोईनची ऑफर आली होती. पण ते सगळं नाकारून मी पतीसोबत राहण्याचा निर्णय घेतला. मला प्रेमाच्या जाळ्यात अडकून माझ्यासोबत लग्न करणाऱ्याला धनंजय मुंडे २० कोटी रुपये देणार होते, असा गंभीर आरोप करुणा शर्मा यांनी केला आहे.

सुनावनीदरम्यान धनंजय मुंडेंचे स्वीकृतीपत्र आणि अंतिम इच्छापत्र करुणा शर्मा यांच्याकडून कोर्टात सादर करण्यात आले. दरम्यान करुणा शर्मा यांनी कोर्टात सादर केलेली कागदपत्रे खोटी असल्याचा दावा धनंजय मुंडे यांच्या वकिलांकडून करण्यात आला. दरम्यान करुणा शर्मा यांनी आपला पासपोर्ट आणि रेशनकार्डही कोर्टात सादर केले.

करुणा शर्मा यांनी कोर्टात धनंजय मुंडेंचे ◀◀ पान २ वर

### इच्छापत्रात नेमकं काय?

अंतिम इच्छापत्रात करुणा शर्मा यांचा पहिली पत्नी असा उल्लेख आहे. यासह धनंजय मुंडेंच्या इच्छापत्रात चार मुलांची नावे आहेत. माझ्या मृत्यूनंतर मुलगा सिशीव माझे अंत्यसंस्कार करणार. करुणा यांनी सादर केलेल्या धनंजय मुंडेंच्या इच्छापत्रात हा उल्लेख आहे. २०१७ च्या आसपास हे अंतिम इच्छापत्र बनवले असल्याची नोंद आहे. राजश्री मुंडे या दुसऱ्या पत्नी आहेत हा देखील उल्लेख केलेला आहे आणि दोन्ही पत्नींपासून किती त्यांना अपत्य आहे, त्यांची नावं काय आहेत हे सगळं त्याच्यामध्ये नमूद करण्यात आलेले आहे.



## पंतप्रधान मोदींना श्रीलंकेचा सर्वोच्च सन्मान

कोलंबो । वृत्तसंस्था

**पंतप्रधान नरेंद्र मोदी तीन दिवसांच्या श्रीलंका दौऱ्यावर आहेत. २०१९ नंतर पहिल्यांदाच पीएम मोदी श्रीलंकेला गेले आहेत. श्रीलंकेने त्यांचे जोरदार स्वागत केले. श्रीलंकेच्या राष्ट्रपती अनुरा कुमारा दिसानायके यांनी पंतप्रधान मोदींना श्रीलंका मित्र विभूषणाया हा सर्वोच्च गैर–नागरी सन्मान प्रदान केला.**

या सन्मानानंतर पंतप्रधान मोदी यांनी हा १४० कोटी भारतीयांसाठी सन्मान असल्याचे म्हटले आहे. पीएम मोदींनी श्रीलंकेचे राष्ट्रपती, सरकार आणि जनतेचे आभार मानले आहेत. मित्र विभूषणय हा श्रीलंकेतील सर्वोच्च बिगर–नागरी सन्मान आहे. हा सन्मान परदेशी मान्यवरांना दिला जातो. श्रीलंकेशी मैत्रीपूर्ण संबंध असलेल्या राष्ट्रप्रमुखांना श्रीलंका सरकार हे पुरस्कार देते. या पुरस्कारात रौप्य पदक आणि प्रशस्तिपत्र दिले जाते. हे पदक श्रीलंकेच्या ९ रत्नांनी सजवले आहे. यात चंद्र, सूर्य, पृथ्वी आणि कमळाच्या पाकळ्या बनवलेल्या आहेत. पदकावर पुन कलसा ◀◀ पान २ वर

### न्यायमूर्ती वर्मा आता अलाहाबाद हायकोर्टचे न्यायाधीश

अलाहाबाद । वृत्तसंस्था

निवासस्थानी मोठ्या प्रमाणावर अवैध रोख रक्कम सापडल्यामुळे चर्चेत आलेले न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी शनिवारी, ५ एप्रिल रोजी अलाहाबाद हायकोर्टचे न्यायाधीश म्हणून शपथ घेतली. तथापि, चौकशी सुरू असल्याने ती पूर्ण होईपर्यंत त्यांना कोणतेही काम दिले जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

सामान्यपणे न्यायमूर्तींच्या शपथविधीसाठी सार्वजनिक समारंभ आयोजित केला जातो, परंतु न्यायमूर्ती वर्मा यांनी आपली शपथ एका खासगी कक्षात घेतली. दरम्यान, अलाहाबाद ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०५ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४२.५० क्विंटल | २,००० | २,८०० | २,५७८ |
| ज्वारी/हायब्रिड : १४७.०० क्विंटल | १,७०० | ३,१०० | २,४३७ |
| मका/लोकल:३०.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : १४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,१७१ | ६,९१६ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ७६.०० क्विंटल | १,८०० | २,७०० | २,४४२ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन:१७४.०० क्विंटल | ४,४५० | ४,६०० | ४,५२८ |
| हरभरा: १४.०० क्विंटल | ४,५५१ | ५,५१९ | ५,२४२ |

### जात, धर्म न पाहता दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील आरोपी डॉक्टरांवर कारवाई करा - आदित्य ठाकरे

मुंबई । प्रतिनिधी

माणसाच्या जाती–धर्माच्या पलिकडेही माणुसकी नावाची गोष्ट असते. पुण्यात दीनानाथ मंगेशकर रुग्णालयामध्ये जो प्रकार घडला तो माणुसकीला काळीमा फासणारा आहे. त्यामुळे आरोपींची जात–धर्म न पाहता त्यांच्यावर सरकारने कडक कारवाई करावी, अशी मागणी आदित्य ठाकरे यांनी केली. रुग्णाकडे १० लाखांची मागणी करणाऱ्या दीनानाथ



मंगेशकर रुग्णालयावर मनपा आणि इन्कम ट्रक्स विभाग काय कारवाई करणार हे स्पष्ट करावे असेही ते म्हणाले.

आदित्य ठाकरे म्हणाले की, ''राज्यात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांचे स्वतंत्र वैद्यकीय कक्ष आहेत. पण त्याचा काय उपयोग? मुख्यमंत्री कार्यालयातून फोन जाऊनही त्या रुग्णालयात महिलेला दाखल करुन घेतले नाही. या रुग्णालयातील प्रशासन इतके मग्रुर का आहे याचे उत्तर सरकारने द्यावे. या हॉस्पिटलचे डॅश बोर्ड आहे की नाही याची माहिती सरकारने द्यावी. तसेच राज्य सरकार हे रुग्णालय ताब्यात ◀◀ पान २ वर

### अवकाळीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून सरसकट भरपाई द्या- आ.क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

**मागील दोन दिवसांत संपूर्ण जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकर्यांच्या पिकांचे व फळबागांचे आतोनात नुकसान झाले आहे आणि होत आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्या. अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी शासनाकडे केली आहे.**



बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील बीड व शिरूर कासार तालुक्यासह संपूर्ण बीड जिल्ह्यात १ ते ३ एप्रिलच्या दरम्यान अवकाळी पाऊस झाला. या पावसाने शेतकऱ्यांच्या शेतात असलेल्या पिकांचे तसेच फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे आणि अद्यापही होत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या वतीने अवकाळी पाऊस हे कारण नियमोचित दाखवून झालेल्या नुकसानीची तक्रार पीक ◀◀ पान २ वर

## कामाला का येत नाहीस म्हणत तरुणांस जिवे मारण्याचा प्रयत्न

### दोघांविरुद्ध माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील आझादनगर येथील २२ वर्षीय तरुणांस दि १७ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ५:४५ वाजण्याच्या सुमारास दुकानावर कामाला का? येत नाहीस असे म्हणत सदर तरुणांचे शहरातुन गाडीतुन बसवून शहरापासून दुर नेत मारहाण करत डोक्यात टांबीने गंभीर मारहाण करत जिवे मारण्याचा प्रयत्न केला म्हणून माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दि १८ मार्च २०२५ रोजी दोघांविरुद्ध



गुन्हा दाखल करण्यात आला असुन पोलीसांना अद्याप पर्यंत एकाही आरोपीस अटक केलेली नसुन याप्रकरणतील दोन्ही आरोपी १८ दिवसांपासून फरार. आहेत

या संदर्भात शहरातील आझादनगर नगर येथील सलमान खाँन जमशेद खाँन पठाण वय–२२ वर्ष यांनी दि १७ मार्च २०२५ रोजी संजिवनी हॉस्पीटल माजलगाव आय.सी.यु.बेड नं.१० वर जखमी आवस्थेमध्ये असताना त्याचा भाऊ नामे आसेफ जमशेद पठाण याचे समक्ष पोलीसांनी जवाब घेतला असुन जबाबात त्यांने असे म्हटले आहे की,मागील दोन वर्षा पूर्वी मी शेख ◀◀ पान २ वर

## वडवणीकरांच्या स्वप्नपूर्तीसाठी सदैव कटिबध्द-आ.प्रकाश सोळंके

### आणखी ३० कोटींचा विशेष निधी देण्याची ग्वाही; वडवणीत विविध विकास कामांचा शुभारंभ

वडवणी । प्रतिनिधी

**वडवणी नगरपंचायतच्या निवडणूकीत वडवणीकरांना मी विकासाचा शब्द दिला होता. वडवणीकरांनी नगरपंचायत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी आणि शहर विकास आघाडीच्या ताब्यात दिली. म्हणून वडवणी नगरपंचायतला हा ४८ कोटी रुपयांचा भरघोस असा निधी उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांच्यामार्फत उपलब्ध करुन देण्यात आला आहे. भविष्यात देखील उर्वरित विकास कामांसाठी कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देवून वडवणीकरांच्या स्वप्नपूर्तीसाठी सदैव कटिबध्द राहणार असल्याचे प्रतिपादन आ.प्रकाश दादा सोळंके यांनी वडवणी येथील विविध विकास कामांच्या भुमिपूजन शुभारंभाप्रसंगी व्यक्त केले.**




वडवणी नगरपंचायतीच्या विविध विकास कामांचा भुमिपूजन शुभारंभ काल शनिवार दि.५ एप्रिल ◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# ...तर भारतीय शेतकऱ्यांचा टिकाव लागणार नाही

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'अमेरिका फर्स्ट' धोरणांतर्गत इतर देशांसोबत 'जशास तसे' कर धोरण राबवण्याचा निर्णय घेतला असून रेसिप्रोकल टॅक्स आकारण्याची घोषणा केली. त्यांनी यासंबंधीच्या अध्यादेशावर स्वाक्षरी केली, त्यानुसार भारतीय मालावर २७ टक्के आयात शुल्क लागू करण्यात आले आहेत. चीनवर ३४ टक्के, व्हिएतनामवर ४६ टक्के, युरोपीय महासंघावर २० टक्के, बांगला देशवर ३७ टक्के तर थायलंडवर ३६ टक्के आयात शुल्क लागू करण्यात आले आहे. ट्रम्प यांनी जगभरातून आयात होणाऱ्या वस्तूंवर कर लादण्याचा आणि प्रमुख व्यापारी भागीदारांवर अतिरिक्त कठोर शुल्क लादण्याचा निर्णय घेतला आहे. चीनच्या वाणिज्य मंत्रालयाने एका निवेदनाद्वारे हे शुल्क त्वरित रद्द करण्याचे आवाहन केले आहे. कारण यामुळे जागतिक आर्थिक विकासाला धोका निर्माण होईल, अमेरिकेचे हित आणि आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळीला हानी पोहोचेल असा इशारा दिला आहे. अमेरिकी वस्तूंवर भारत मोठ्या प्रमाणात आयात शुल्क लावत असल्याचा आरोप ट्रम्प प्रशासनाने वारंवार केला होता. भारत अमेरिकन मालावर ७० टक्के कर आकारत असल्याचा आरोप आहे.

ट्रम्प पत्रकार परिषदेत म्हणाले, 'अमेरिका फर्स्ट' अभियानासाठी कर लावणे गरजेचे होते. 'जशास तसे' कर लावल्याने अमेरिकन तिजोरीत दरवर्षी ४३ लाख कोटी रुपयांची भर पडेल. अमेरिकेत येणाऱ्या जवळपास सर्व वस्तूंवर किमान १० टक्के कर लादला जाईल. व्यापार तूट कमी करण्यासाठी भारतीय उत्पादनांच्या आयातीवर २६ टक्के कर लावण्यात आला आहे. भारताकडून आकारण्यात येणाऱ्या आयात शुल्काच्या तुलनेत हा कर निम्मा आहे. भारतासह सुमारे २५ देशांवर अशाच प्रकारे आयात शुल्क लावण्यात आले आहे. आयात शुल्काची घोषणा करताना ट्रम्प म्हणाले, आमच्यासाठी हा मुक्तिदिन आहे. दिर्घकाळापासून या दिवसाची प्रतीक्षा होती. अमेरिकन उद्योगाचा पुनर्जन्म, अमेरिकेच्या भाग्योदयाचा दिवस म्हणून २ एप्रिल २०२५ ही तारीख लक्षात ठेवली जाईल. या दिवशी आम्ही अमेरिकेला पुन्हा समृद्ध करण्याचे काम सुरू केले. डोनाल्ड ट्रम्प यांनी कर आकारणीवरून जगाला दिलेला इशारा अखेर अमलात आणला आहे. जगातील जवळपास १०० देशांवर ट्रम्प यांनी 'जशास तसा' (टॅरिफ) कर लावला आहे.

या 'कर'भाराविरोधात जगभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. १० टक्के टॅरिफची अंमलबजावणी ५ एप्रिलपासून तर 'जशास तसा' कराची अंमलबजावणी ९ एप्रिल रोजी सुरू होईल.

टॅरिफ म्हणजे एखाद्या देशातून आयात करणाऱ्या वस्तूंवर लावलेले शुल्क. भारतातून अमेरिकेत जाणाऱ्या वस्तूंवर २६ टक्के टॅरिफ लावले जाईल. याचा भारताच्या वेगवेगळ्या क्षेत्रांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. सर्वाधिक प्रभाव कृषी क्षेत्रावर पडू शकेल. भारताने कृषी क्षेत्रात क्रांती केली आहे. भारताची अर्धी लोकसंख्या कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. कृषी क्षेत्रात भारत जगातील आठव्या क्रमांकाचा निर्यातदार देश आहे. तसेच सर्वांत मोठा दूध उत्पादक देशही आहे. भारत जगभरात धान्य, फळे, दुग्धजन्य पदार्थ निर्यात करतो. भारत अमेरिकेला तांदूळ, कोळंबी, मध, एरंडेल तेल, काजू, फळे, भाजीपाला, डेअरी उत्पादने, चहा-कॉफी, कोको पावडर, मसाल्याचे पदार्थ निर्यात करतो तर अमेरिकेतून बदाम, अक्रोड, पिस्ता, सफरचंद आणि कडधान्य भारतात येते. अमेरिकेचा डोळा भारतातल्या कृषि बाजारपेठेवर आहे. याआधीही अमेरिकेने भारताची कृषि बाजारपेठ खुली करण्याची मागणी केली होती. अमेरिकेने लादलेल्या टॅरिफमुळे भारतीय कृषी क्षेत्रावर परिणाम होण्याची शक्यता आहे. भारतातील अमेरिकन कृषी उत्पादनावर सरासरी ३७.७ टक्के टॅरिफ लावण्यात आला आहे. अमेरिकेत भारतीय कृषी उत्पादनावर हा कर ५.३ टक्के होता. आता अमेरिकेने त्यात वाढ केली आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या नियमानुसार भारत विकसनशील देश असल्याने भारताला अधिक कर लादता येतो. पण आता ट्रम्प यांनी 'मेक इन अमेरिका ग्रेट अगेन' ही मोहीम हाती घेतली आहे. भारतातून अमेरिकेत निर्यात जास्त होते तर आयात कमी होते. भारतीय शेतमालावर २६ टक्के टॅरिफ लावल्याने भारतीय वस्तू अमेरिकन बाजारपेठेत प्रचंड महाग होतील आणि त्याचा फायदा तेथील स्थानिक उत्पादकांना होईल. ट्रम्प सरकारला मोठा महसूल मिळेल आणि भारतीयांचे नुकसान होईल. ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणामुळे आणि दबावामुळे भारतीय कृषि बाजारपेठ खुली झाली आणि विदेशी उत्पादनावरील आयात कमी झाली तर भारतीय शेतकऱ्यांचा टिकाव लागणार नाही. डोनाल्ड ट्रम्प भारताचा उल्लेख करताना म्हणाले, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी काही दिवसांपूर्वीच इथे येऊन गेले. ते माझे फार चांगले मित्र आहेत. मी त्यांना म्हटले की, तुम्ही माझे मित्र असलात तरी माझ्या देशावर अन्याय करत आहात. त्यांनी आपल्यावर ५२ टक्के कर लावला आहे. त्या तुलनेत गेली कित्येक वर्षे आपण त्यांच्याकडून काहीच कर घेतलेला नाही. ट्रम्प यांच्या वक्तव्यावरून त्यांचे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत हेच दिसून येते. ट्रम्प यांना मोदी काय आणि कसे उत्तर देतील ते बघावे लागेल.

# रघुकूलनायक प्रभु श्रीराम



**आज राम नवमी अयोध्या नगरीत प्रभु श्री रामचंद्राचा जन्म झाला. हाच आजचा दिवस म्हणजे राम नवमीचा उत्सव संपूर्ण हिंदुस्थानात साजरा होतो.**

भारतखंडामध्ये दशरथ नावाचा राजा होऊन गेला.ज्यावेळी श्रावणबाळ आई वडिलांना घेऊन काशी यात्रेला निघाले होते त्यावेळी दशरथाच्या हाताने श्रावणाचा वध झाला व त्यावेळी श्रावणाच्या आई वडिलांने दशरथाला शाप दिला होता तू मरताना पुत्र पुत्र करून मरशील. त्यावेळी दशरथाने पुत्र कामेष्टी यज्ञ केला. दशरथाला तीन पत्नी सुमित्रा, कौशल्या व कैकयी होत्या. कौसल्याचे पोटी श्रीरामाचा अवतार झाला. श्रीराम म्हणजे विष्णूचा अवतार समजला जातो. राम म्हणजे एक बाणी एक पत्नी व एक वचनी होता. म्हणून त्यांना आदर्श राम म्हणतात. श्री रामावर श्रद्धा ठेवून पहाटे उठून श्रीरामाचे अखंड चिंतन केले तर यज्ञ यागाचे पुण्य मिळते. श्री राम जय राम जय जय राम या त्रयोदश शब्दांच्या मंत्रात महान सामर्थ्य आहे.

पवनपुत्र हनुमानाने या मंत्राच्या सामर्थ्यावर सेतू पूल बांधून सीतेची वनवासातून सुटका केली होती. हनुमानाची रामावर एवढी भक्ती होती की, हनुमान म्हणत असत कि मला राम चिंतनातच बुडवून टाक. फक्त श्रीरामाचा नाम हा माझा अस्तित्वाचा खेळ होऊ दे, मला भक्त श्री रामाचे दर्शन पाहिजे त्याचे नाव सतत मुखात असू दे. प्रत्येक घरात श्री राम नांदत आहे. ती राम भक्ती आपल्या अंतःकरणात असते. श्री राम नामाचा घोष माणसाला प्रपंचाकडून परमार्थाकडे घेऊन जाते. सर्व काही भगवंत करतो. मी फक्त निमित्त मात्र आहे ही भावना दृढ झाली की, मन निःशंक होते व मनातच रामाचे नाम घुमते. सर्व भक्ताने व्यवहार आत्मानंदासाठी करावा. श्री रामाचे दर्शन पहाटे जाग आल्यापासून आपोआप नामस्मरणाने करावे. रामाची एवढी महती का गायली जाते तर एका धात्रीच्या सांगण्यावरून रामाला चौदा वर्षे वनवास भोगावा लागला होता. ज्यादिवशी राज्याभिषेक व्हायचा डोक्याला सोन्याचा मुकुट बसायचा त्यादिवशी डोक्याला वडाचे पान बांधले गेले. पायात घालायला वाहन मिळाले नाही. तर लव कुश यांना एका ऋषींच्या आश्रमात जन्म घ्यावा लागला. ऐन तारुण्यात पत्नी वियोग सहन करावा लागला. तर त्यांच्या पत्नीला एका धोब्याच्या बोलण्यावरून सीतेला अग्नीपरीक्षा द्यावी लागली. हा काळ रामाचा साडेसातीचा काळ होता, असे म्हणतात. म्हणून ज्या साधू संताला अनेक प्रकारे संकटाला तोंड द्यावे लागले.

आपण तर सर्व सामान्य माणसे आहोत. या साठी थोरा मोठ्यांचे ग्रंथ वाचावे लागतात. ज्या लोकांनी असा अनेक संकटाला तोंड दिले ते सामर्थ्य आपल्यात आले पाहिजे. कुंतीने देवाला वर मागितला होता. तुला जेव्हढे माझ्यावर संकट पाठवायचे आहेत ते पाठव कारण संकटाला तोंड देण्याचे सामर्थ्य तुच 'देणार आहे. त्यासाठी नामस्मरणाची गरज आहे. देवावर विश्वास व श्रद्धा पाहिजे. एकदा रामनामाची सवय जडली व अंतःकरणात नामस्मरण अखंड उमटले की रामनामाच्या नौकेत बसून आपण हा भवसागर पार करू शकतो. राम नामाच्या नामात एवढे दंग व्हायचे कि आपलीच आपल्याला जाणीव राहू नये. राम नाम म्हणण्याचा शेवट राम प्राप्तीत व्हावा. राम राम म्हणण्याचा परिणाम राम निश्चित मिळेल याचा विश्वासच असतो.

**नागनाथ वारद, अंबाजोगाई**



**बीड: दत्तात्रय दुधाळ यांना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक म्हणून पदोन्नती मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना प्रदीप जगताप, नंदकिशोर उपरे, रावसाहेब भोसले, सुधाकर तांदळे, सतीश बहीर, राजेंद्र देशमाने, अमोल धोंगडे, रवींद्र गाडेकर आदि.**

## कृषीमंत्री माणिकराव कोकाटेंची हकालपट्टी करा

मुंबई : प्रतिनिधी

बळीराजा हा जगाचा पोशिंदा आहे. पण त्याचा अपमान करण्याची एकही संधी भाजप युती सरकार सोडत नाही. राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटेंना सत्तेचा एवढा माज चढला आहे की, ते सातत्याने शेतक-यांचा अपमान करत आहेत. शेतक-यांना भिकारी म्हटल्यानंतर आता या महाशयांनी कर्जमाफीचे काय करता, लग्न, साखरपुडे करता, शेतीत गुंतवता का, असा अजब प्रश्न विचारून पुन्हा एकदा अपमान केला आहे. शेतक-यांचा अपमान करणा-या कोकोटेंना मंत्रिमंडळातून हाकलून द्या, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

सत्तेत आल्यानंतर शेतक-यांची कर्जमाफी करण्याचे आश्वासन महायुतीने दिले होते ते अद्याप पाळलेले नाही, कर्जमाफीसाठी पैसे नाहीत असे सरकार म्हणते, त्यात कर्जमाफीवरून कृषी मंत्र्यांचा शेतक-यांना प्रश्न म्हणजे 'चोर तो चोर आणि वरून शिरजोर' असा प्रकार आहे. शेतक-याला सरकार मदत करते किंवा कर्जमाफी करते म्हणजे काही उपकार करत नाही. तो जनतेचा पैसा आहे, कोकाटेच्या घरचा नाही. सरकारची धोरणे जर शेती व शेतक-याला अनुकुल असती तर शेतकरी सरकारच्या मदतीवर कशाला अवलंबून राहिल. पण भाजप युती सरकार हे शेतकरीविरोधी आहे. मूठभर उद्योगपतींना १६ लाख कोटींचे कर्जमाफ केले.



**बीडः पोस्टचे श्री शिवाजी चौधरी यांचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती झाल्याने त्यांना शिरूर पोलीस स्टेशनचे प्रभारी श्री धोकरट साहेब फित लावताना**

# पान १ वरून...

### घरकूल बांधकामासाठी पन्नास

२७ हजार रुपये व स्वच्छ भारत मिशनअंतर्गत शौचालय बांधणीसाठी १२ हजार रुपये दिले जातात. आता ग्रामविकास विभागाच्या निर्णयानुसार ५० हजार रुपये वाढीव मिळणार आहेत. असे प्रत्येक लाभार्थीस आता दोन लाख नऊ हजार रुपये मिळतील.

------------

### शेतकरी कर्जमाफी कृषी मंत्र्यांच्या

कोकोटेंना मंत्रिमंडळातून हाकला, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. सपकाळ पुढे म्हणाले की, ''सत्तेत आल्यानंतर शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचे आश्वासन महायुतीने दिले होते ते अद्याप पाळलेले नाही. कर्जमाफीसाठी पैसे नाहीत असे सरकार म्हणते, त्यात कर्जमाफीवरून कृषी मंत्र्यांचा शेतकऱ्यांना प्रश्न म्हणजे 'चोर तो चोर आणि वरून शिरजोर' असा प्रकार आहे. शेतकऱ्याला सरकार मदत करते किंवा कर्जमाफी करते म्हणजे काही उपकार करत नाही. तो जनतेचा पैसा आहे, कोकाटेच्या घरचा नाही, असा थेट हल्ला सपकाळ यांनी केला. सरकारची धोरणे जर शेती व शेतकऱ्याला अनुकुल असती तर शेतकरी सरकारच्या मदतीवर कशाला अवलंबून राहील. पण भाजपा युती सरकार हे शेतकरीविरोधी आहे. कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी आपल्या अकलेचे तारे तोडले आहेत. मूठभर उद्योगपतींना १६ लाख कोटींचे कर्जमाफ केले तेव्हा असा प्रश्न विचारण्याची धमक कोकाटे किंवा सरकारने दाखवली नाही, मग शेतकऱ्यांनाच प्रश्न विचारण्याची हिंमत का होते, अशी खरमरीत टीका काँग्रेसकडून करण्यात आली. कोकाटेंनी यापूर्वीही भिखारीसुद्धा एक रुपया घेत नाही आम्ही शेतकऱ्यांना एक रुपयांत विमा देतो, असे वक्तव्य करून शेतकऱ्यांचा अपमान केला होता. सातत्याने शेतकऱ्यांचा अपमान करण्याचा रोग या महोदयांना जडला आहे. त्यांनी राज्यातील शेतकऱ्यांची माफी मागावी, अशी मागणीही हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

----------

### पंतप्रधान मोदींना

कोरलेले आहे. ते भाताने भरलेले भांडे असते. हे समृद्धी आणि नूतनीकरणाचे प्रतीक मानले जाते. पदकावरील सूर्य आणि चंद्र हे भारत आणि श्रीलंकेतील शाश्वत संबंधांचे प्रतिनिधित्व करतात. हा पुरस्कार २००८ मध्ये श्रीलंकेचे तत्कालीन राष्ट्रपती महिंदा राजपक्षे यांनी सुरू केला होता.

--------------

### धनंजय मुंडेंना मोठा धक्का;

स्वीकृतीपत्र सादर केले. न्यायालयात जे स्वीकृतीपत्र सादर करण्यात आले, त्यामध्ये धनंजय मुंडे यांनी करुणा शर्मा यांच्याशी ९ जानेवारी १९९८ मध्ये वैदिक पद्धतीने लग्न केल्याचा उल्लेख आहे. आई वडिलांच्या दबावाखाली दुसरे लग्न केले पण करुण शर्मा यांच्यासोबत घटस्फोट घेणार नाही, असा उल्लेख या स्वीकृतीपत्रात आहे. करुणा शर्मा आणि दोन्ही मुलांसोबत राहणार असल्याचा उल्लेख देखील, त्यामध्ये आहे. मात्र हे स्वीकृतीपत्र खोट असल्याचा दावा धनंजय मुंडे यांच्या वकिलांनी केला आहे. तर दुसरीकडे धनंजय मुंडे यांचे अंतिम इच्छापत्र देखील सादर करण्यात आले आहे. धनंजय मुंडेंच्या अंतिम इच्छापत्रामध्ये करुणा शर्मा यांचा पहिली पत्नी असा उल्लेख करण्यात आला आहे. धनंजय मुंडेंच्या इच्छापत्रामध्ये पाच मुलांची नावे देखील आहेत. दरम्यान माझगाव न्यायालयाच्या या निकालामुळे करुणा शर्मा यांना मोठा दिलासा मिळाला आहे, तर धनंजय मुंडे यांना मोठा धक्का बसला आहे. करुणा शर्मा यांना पोटगी देण्याचा निकाल न्यायालयाने कायम ठेवला आहे. आता या निकालाला धनंजय मुंडे हे उच्च न्यायालयात आव्हान देऊ शकतात.

---------

### अवकाळीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे

विमा कंपनीच्या 'क्रॉप इन्शुरन्स' ॲपवर करण्यासाठी तलाठी अर्थात महसूल आणि कृषी विभागाच्या यंत्रणेकडून शेतकर्यांना कळवावे. तसेच प्रशासनाने तातडीने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीचे पंचनामे करावेत जेणेकरून शेतकरी बांधवांना नुकसान भरपाई मिळण्यास मदत होईल. अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री, मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, कृषी आयुक्त तसेच जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

-----------

### जात, धर्म न पाहता दीनानाथ मंगेशकर

घेणार का? हेदेखील स्पष्ट करावे, असे ठाकरे म्हणाले. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून रुग्णालयाच्या प्रशासनाला अनेक फोन गेले. पण कोणाचाही फोन येऊ दे, दहा लाख भरल्याशिवाय ॲडमिट करुन द्यायचे नाही, असा आदेश देण्यात आला. हे कृत्य माणूसकीला काळीमा फासणारे आहे, असे आदित्य ठाकरे म्हणाले. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात घडलेल्या या प्रकरणाची सखोल तपासणी व्हावी आणि रुग्णालयावर कडक कारवाई व्हावी अशी मागणी आदित्य ठाकरे यांनी केली. आदित्य ठाकरे म्हणाले की, ''काही विषयांवर आम्ही राजकारण टाळत असतो. भाजपच्या महिलांनी एका डॉक्टरच्या क्लिनिकवर आंदोलन केले. आम्ही देखील आंदोलन केले. या राज्यात भाजपचे कार्यकर्तेच सुरक्षित नाहीत. ज्या राज्यात मुख्यमंत्री स्वतःच्या कार्यकर्त्यांना न्याय देऊ शकत नसतील तर नागरिकांनी काय करायचे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

--------------

### न्यायमूर्ती वर्मा आता अलाहाबाद

वकील संघाने त्यांना विरोध केला होता. तथापि, केंद्राने २८ मार्च रोजी दिल्लीहून त्यांची अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली केली होती. सुप्रीम कोर्टाच्या कॉलेजियमच्या शिफारसीनुसार ही बदली केली आहे. अलाहाबाद वकील संघाने म्हटले होते की ते भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या न्यायमूर्तींना अजिबात सहन करणार नाहीत. तसेच वकीलांना अनिश्चित काळासाठी संप सुरू केला होता. तथापि, प्रमुख न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी संघाला आश्वासन दिल्यानंतर संप स्थगित झाला होता.

----------

### वडवणीकरांच्या स्वप्नपूर्तीसाठी

२०२५ रोजी राज्याचे माजी मंत्री तथा माजलगांव विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार आ.प्रकाश दादा सोळंके यांच्या हस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा सौ.वंदनाताई शेषेराव जगताप तर प्रमुख पाहूणे म्हणून बीड जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती जयसिंग भैय्या सोळंके यांची उपस्थिती होती. तसेच प्रमुख अतिथी म्हणून माजलगांवचे माजी सभापती जयदत्त नरवडे, उपनगराध्यक्ष बन्सीधर भाऊ मुंडे, माजी नगराध्यक्ष राजाभाऊ अण्णा मुंडे, माजी सभापती दिनकरराव आंधळे, ज्येष्ठ नेते आसाराम मामा महादर, ज्येष्ठ नेते अंकुशराव शिंदे पाटील, युवा नेते भारत दादा जगताप, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संभाजी तात्या शिंदे, नगरपंचायत गटनेते अस्लम भैय्या कुरेशी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष बजरंग अप्पा साबळे, युवा नेते बाबरीशेठ मुंडे, माजी जिल्हा परिषद सदस्य सर्जेराव महाराज आळणे, माजी जिल्हा परिषद सदस्य औदुंबर काका सावंत, माजी जिल्हा परिषद सदस्य नवनाथराव म्हेत्रे, माजी सरपंच गंपूशेठ पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष विठ्ठलराव भुजबळ, रिपाईचे तालुकाध्यक्ष महादेव दादा उजगरे, पंचायत समितीचे माजी सभापती बळीराम आजबे, माजी सभापती प्रशांत सावंत, माजी उपसभापती संदिपान खळगे, माजी उपसभापती महादेव आंबूरे, बाजार समितीचे संचालक सचिन लंगडे, युवा नेते आनंद काळे यांसह सर्व नगरसेवक, व्यापारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलतांना आ.प्रकाश सोळंके म्हणाले की, महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आहे. त्याअनुषंगाने वडवणी नगरपंचायतमध्ये महायुती एकत्र येवून व बैठका घेवून वडवणीच्या विकासकामांसाठी आम्ही एकत्र आलो असून काही प्रभागांत विकास राहिला होता मात्र आता यापुढे तो राहणार नाही. कारण यासाठीही ३० कोटी रुपयांचा विशेष निधी आपण लवकरच उपलब्ध करुन देणार आहोत. वडवणी तालुक्यातील ग्रामीण भागातील गावांसाठी एक जनता दरबार घेवून जागीच ग्रामस्थांचे प्रश्न सोडविण्यासाठी जनता दरबार भरवणार आहे. तसेच वडवणी शहरातील नागरिकांसाठीही एक जनता दरबार भरवणार आहे. नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष यांनी वडवणी शहरातील होणारे विकास कामे दर्जेदार करुन घ्यावेत असे मत आ.प्रकाश दादा सोळंके यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी बोलतांना माजी नगराध्यक्ष राजाभाऊ अण्णा मुंडे म्हणाले की, वडवणी शहराच्या व प्रत्येक वडवणीकरांच्या सर्वांगिण विकासासाठी आम्ही एकत्र आलेलो असून वडवणी शहरातील आठवडी बाजारासाठीच्या जागेचा प्रश्न, रस्ते, विविध अडचणी आम्ही दूर करुत आणि विकास कामांचा धडाका सुरुच ठेवूत असे मत राजाभाऊ मुंडे यांनी व्यक्त केले. यावेळी बोलतांना नगराध्यक्षपती शेषेराव जगताप म्हणाले की, निवडणूकी दरम्यान वडवणीकरांना जे-जे शब्द दिले होते ते आज शब्द पूर्ण करुन आज वडवणी शहरासाठी ४८ कोटीचा निधी आ.प्रकाश दादा सोळंके यांनी उपलब्ध करुन देत शब्द पूर्ण केला आहे. मागितल्यापेक्षा जास्त निधी आमदार दादांनी दिला आहे. सध्या पाच कोटींची अत्याधुनिक नगरपंचायत इमारत उभारण्यात येत आहे. नगरपंचायतच्या विकास कामांसाठी आमदार प्रकाश दादा सोळंके हे भविष्यातही निधी उपलब्ध करुन देतील अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच पी.एम.किसान योजनेचा लाभ अनेक शेतकऱ्यांना मिळत नाही. तो प्रश्न मार्गी लावून शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळवून द्यावा. वडवणी शहरातील शेतकऱ्यांना एमआरईजीएस मधून विहीर मंजूर व्हावी यासाठी प्रयत्न करावा अशी मागणी देखील शेषेराव बाप्पु जगताप यांनी यावेळी केली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अमोल राठोड सर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपनगराध्यक्ष बन्सीधर भाऊ मुंडे यांनी केले तर शेवटी सर्व उपस्थितांचे आभार गटनेते अस्लम भैय्या कुरेशी यांनी मानले. नगरोत्थान रस्ते विकास प्रकल्पासाठी २० कोटी रुपये, वैशिष्ट्यपूर्ण योजनासाठी १० कोटी रुपये, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विकास योजनासाठी ५ कोटी रुपये, गार्डन व छत्रपती शिवाजी महाराज म्युझियमसाठी ५ कोटी रुपये, अभ्यासिका वाचनालय व व्यायाम शाळासाठी २ कोटी रुपये, बाजारतळ विकसीत करणेसाठी १ कोटी रुपये, जलशुद्धिकरण येथे कंपाऊंडवॉल करणेसाठी १ कोटी रुपये, विविध सभामंडप यासाठी १ कोटी रुपये, शहरातील प्रभू श्रीराम मंदिर सभागृहासाठी ३५ लक्ष रुपये, जिल्हा वार्षिक योजना यासाठी १ कोटी ५० लक्ष रुपये अल्पसंख्याक विभाग शादीखाना १ कोटी रुपये अशा एकूण ४७ कोटी ८५ लक्ष रुपयांची विकासकामे लवकर पूर्णत्वास जाणार आहेत.

------------------

### कामाला का येत नाहीस म्हणत

परवेझ पाशा रा.फुले नगर माजलगाव यांच्या चुनमई चौक हनुमान चौकाचे मागे असलेल्या सारा कलेक्शनवर कामाला होतो. तेंव्हा मी मालक परवेझ शेख यांचे नावे आय फोन मोबाईल घेतला होता.दरम्यान आमचे जमत नसल्याने त्याने मला एक वर्षापुर्वी दुकानावरुन काढून टाकले.व दोन हप्ते भरुन आय फोन मोबाईल त्याने ठेवुन घेतला होता.त्या दरम्यान आमच्यामध्ये भांडन झाले होते परंतु मी तक्रार दिली नव्हती मागील तीन महिन्यापासुन परवेझ पाशा शेख हा परत माझ्या संपर्कात आला. व मला दुकानावर कामाला ठेवतो असे सांगत होता.दि दिनांक १७ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ५.४५ वाजता (पावने सहा वाजता) सुमारास मी चुनमई चौक हनुमान मंदीराचे बाजुला येथे आसताना तेथे शेख परवेझ पाशा याने मला माझ्या इन्स्टाग्रामवर व्हाईसकॉल करुन बायपास टिक.टॉक हॉटेल जवळ ये आपण इफ्तार पार्टी करु असे सांगुन बोलावुन घेतले तेथे परवेझ पाशा शेख व त्याचा मेव्हणा मुदशिर शेख असे दोघे नेऊन ब्लु कार जवळ उभे होते. तेंव्हा परवेझ मला म्हणाला की,तु गाडीत बस आपण कामा बाबत चर्चा करु मला सुरतला निघायला वेळ आहे.तेंव्हा मी गाड़ीत बसलो मी व परवेझ पाठीमागे बसलो होतोत.तर त्याचा मेव्हणा गाडी चालवत होता, परवेझ ने सांगीतल्या प्रमाणे त्याचा मेव्हण्याने गाडी चालू करुन संभाजी चौक व तेथुन सरळ गाडी रोडने गढ़ी रोडने पुढे बाजीराव दादा जगताप यांचे खडी क्रेशर जवळील डगरीच्या बाजुला नेऊन बहोत सता रहा था दुकान पे आणे के लीय असे म्हणुन परवेझने मला बाजुला शेडमध्ये लोक आहेत असे म्हणुन तेथे घेवुन गेला व मला खाली पाडले व माझा गळा दाबुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला मी कसेतरी सोडवण्याचा प्रयत्न करत असताना त्याचा साला मुद्दशिर शेख रा. गेवराई पुर्ण नाव व पत्ता माहीत नाही, याने टांबीने माझ्या डोक्यावर जिवे मारण्याच्या उद्देशाने मारले व जिवे मारण्याचा प्रयत्न केला तेंव्हा मी बेशुध्द झाल्याचे नाटक केल्याने त्यांनी मला गाडीत टाकले तेंव्हा ते पेट्रोल टाकुन याला जाळून टाकु असे म्हणत असल्याचे मी ऐकले,तेथेच आजु बाजुला कोठेतरी त्यांनी मला मर गया बोलके फेक दिया मी रस्त्याच्या बाजुला यवुन लोकांना हात दाखवत होतो. तेव्हा दोन जन मोटार सायकलवर आले मला विचारपुस केली. तेंव्हा मी माझा मित्र सद्दाम शेख याचा नंबर त्या लोकांना दिला थोड्या वेळाने त्याठीकाणी माझा भाऊ आसेफ जमशेद पठाण, फारुक पाशा सय्यद,जावेद बिबन शेख,सद्दाम मुनिर शेख, असे आले व मला उचलुन गाडीमध्ये संजिवनी हॉस्पीटल माजलगाव येथे घेवुन आले. तरी आज रोजी माझे सांगणे की, मी परवेझ पाशा शेख त्याच्या दुकानावर कामाला का येत नाही याचा राग मनामधू? धरुन परवेझ पाशा शेख व त्याचा मेव्हुना नामे मुद्दशिर शेख या दोघांनी मिळुन माझा गळा दाबुन व डोक्यामध्ये टांबी मारुन जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या फिर्यादीवरुन माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दि १८ मार्च २०२५ रोजी आरोपी शेख परवेझ पाशा व मुदशिर शेख या दोघां विरोधात गु.र.नं.०१०९ भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस.) २०२३,कलम १०९ (१),१३७ (२),३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन या प्रकरणातील आरोपी पोलीसांनी अटक केलेली नसुन १८ दिवसांपासून फरार आहेत, या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक माकणे हे करत आहेत.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार, दि. ६ एप्रिल २०२५


# गटविकास अधिकाऱ्याच्या विरोधात पत्रकार संतोष रासवे कारणार डफली बजाव आंदोलन

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाच्या गटविकास अधिकारी ज्योत्स्ना मुळीक या झोपेचे सोंग घेऊन बसले आहेत त्यांना जाग करण्यासाठी पत्रकार संतोष रासवे यांनी डफली बजाव आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

माजलगाव तालुक्यात पंतप्रधान घरकुल आवास योजना असेल किंवा रमाई घरकुल योजना असेल सदर घरकुल योजनेत लाभार्थ्यांची सरासपणे लूट चालवली आहे तुम्ही घर बांधता किंवा नाही बांधता मला याच्याशी काही देणंघेणं नाही मला माझी रक्कम द्या आणि तुमचा हप्ता घेऊन जा असा उचांद मांडलेल्या कॉन्ट्रॅक्ट बेस वरील इंजिनियर ला आवरा यासाठी माजलगाव गटविकास अधिकारी ज्योत्स्ना मुळीक यांना अनेक वेळा तोंडी सूचना दिल्या वृत्तपत्रातून बातम्या छापून आणल्या मात्र झोपेतच सोंग घेऊन बसलेल्या ज्योत्स्ना मॅडमला जाग येत नाही म्हणून शेवटी पत्रकार संतोष रासवे यांनी जोत्सना मॅडम यांना जागे करण्यासाठी डफली बजाव आंदोलन करणार असल्याचे तोंडी सांगितले आहे या वर ही मॅडम जाग्या झाल्या नाहीआम्ही ग्रामीण पत्रकार जनतेचे शेवक या नात्याने शेवटचं अस्त्र म्हणून पँच क्रोशीतील घरकुल लाभार्थी यांना एकत्र करून पंचायत समितीवर हल्ला बोल आंदोलन करू असे शेवटी पत्रकार संतोष रासवे यांनी सांगितले

# नांदेवलीच्या सप्ताहात भाविक घेतात रामकथेचा गारवा

## मानवी जीवनाला सकारात्मक आकार देण्यासाठी रामकथा उपयुक्त –नंदकिशोर महाराज

**शिरूर । शंकर भालेकर**

मानवी जीवनाचे विस्कटलेली घडी श्रीरामकथा श्रवण पुन्हा मानवी जीवनाला आकार देऊन जाते.राकथेतील एकेक प्रसंग मानवी जीवनाचा उद्धार करण्याचे कार्य करत असतो. म्हणून माणसाने राम कथेमध्ये बसून कथा श्रवण करावी आणि मानवी जीवनाला सकारात्मक आकार द्यावा किंबहुना मानवी जीवनाला सकारात्मक आकार देण्यासाठी रामकथा उपयुक्त ठरत असल्याचे प्रतिपादन रामायणाचार्य हभप. नंदकिशोर महाराज चव्हाण (बोधेगांव)यांनी नांदेवली येथे केले.

वै. महंत स्वामी निगमानंद महाराज संकल्पनेतून साकारलेला श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचा ४७ नारळी सप्ताह शिरूर कासार तालुक्यातील मौजे नांदेवली या गावांमध्ये गेल्या चार दिवसापासून मोठ्या थाटामध्ये पार पडत आहे. गडाचे मठाधिपती महंत जनार्दन महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली चालू असलेल्या सप्ताह सोहळ्याला दिवसेंदिवस मोठे व्यापकरूप प्राप्त होऊ लागले आहे. यामुळे याठिकाणी भाविक –भक्तांचाही मोठा ओघ वाढतांना दिसत आहेत. गेल्या चार दिवसापासून या ठिकाणी हजारो भाविक भक्त डेरे दाखल झाले असून या ठिकाणी अध्यात्मिक ज्ञानरसाचाआंनद लुटत आहेत. भाविका–भक्तांना ज्ञानमृताची प्रबोधन मिळावे त्याच बरोबर भरकटत चाललेला तरुण पिढीला याठिकाणाहून चांगली प्रेरणा मिळावी उद्देशाने या ठिकाणी आध्यात्मिक व धार्मिक कार्यक्रमाच्या माध्यमातून समाज




प्रबोधन, जनजागृतीचे उपक्रम राबवले जात आहेत.त्याच बरोबर समाजाला रामकथेचे महत्त्व पटावे आणि मानवी जीवन समृद्ध व्हावे या उद्देशाने हभप.महंत जनार्दन महाराज वतीने रामायणाचार्य हभप. नंदकिशोर महाराज चव्हाण (बोधेगांव) यांच्या संगीत रामकथेचे आयोजन करण्यात आले आहे.चौथ्या दिवसाच्या कथेमध्ये नंदकिशोर महाराज यांनी अयोध्येत सुरु असलेल्या रामराज्यभिषेक सोहळ्याला विकृत, विकल्पित मंथरे कशी व्रकदृष्टी पडली आणि राजगादीवर बसणाऱ्या श्रीरामासह सीतामाई, लक्ष्मण भैयाला ऐनवेळी वनवासाचा रस्ता धरावा लागला. या अयोध्येनगरीत जे वातावरण निर्माण झाले होते तो प्रसंग हभप. नंदकिशोर महाराजांनी आपल्या रसाळ वाणीतून समाजापुढे मांडले होते.याच प्रसंगाला अनुसरून महाराजांनी गायलेली करूण स्वरातील गीत उपस्थित भाविक भक्तांच्या मनाला वेदना देऊन गेली यामुळे अनेकांना आपल्या डोळ्यातील अश्रू आवरता आले नाहीत. प्रस्तुत कथेमधून महाराजांनी कुटुंबामध्ये एकमेकांशी कसे वागावे आणि एकमेकां बद्दल प्रेम कसे जोपसावे या बद्दल अट्टहासने सांगितले आहे. यावेळी अधिकचे संतान सांगताना महाराज म्हणाले मानवी जीवनाच्या उद्धारासाठी राम कथा मोठी प्रेरणादायी ठरत आहे. किंबहुना मानवी जीवनाला सकारात्मक आकार देण्यासाठी राम कथा उपयुक्त ठरत असल्याचे यावेळी महाराजांनी प्रतिपादन केले आहे. या कथेच्या माध्यमातून समाजापुढे गायली जाणारी विविध भाविक भक्तांच्या मनाला भुरळ घालत आहेत. यामुळे हजारो भाविक भर उन्हामध्ये सप्ताहाच्या मंडपात राम कथेचा गारवा घेत आहेत. या कथेसाठी हभप रवींद्र महाराज चव्हाण, संदेश महाराज अवताडे, सुंदर महाराज साठे, श्रीहरी महाराज चव्हाण, जगन्नाथ महाराज खेडकर, देवेश महाराज चव्हाण यांची साथ संगत लाभली होती.

# आर्किटेक्ट अर्शद शेख यांच्या ग्रंथाचे थाटात प्रकाशन

बीड । प्रतिनिधी

सुप्रसिद्ध आर्किटेक्ट अर्शद शेख यांच्या इस्लाम द अल्टिमेट आर्ट ऑफ लिव्हिंग या ग्रंथाचे दिनांक ०३ एप्रिल २०२५ रोजी थाटात प्रकाशन करण्यात आले. या ग्रंथासाठी सहकार्य करणारे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांच्या कार्याचे यावेळी अर्शद शेख यांनी तोंड भरून कौतुक केले.

अर्शद शेख हे पेशाने जरी आर्किटेक्ट असले तरी समाजातील इतर क्षेत्रात सुद्धा सातत्याने विविध कार्य करत असतात. यात सामाजिक कार्यांसह लेखन कार्यही प्रमुख आहे. यापूर्वी सुद्धा त्यांनी



**एस.एम.युसूफ़ यांच्या कार्याचे केले कौतुक**

आर्किटेक्शचर आणि अर्शदनामा ही पुस्तके लिहिली आहेत. इस्लाम द अल्टिमेट आर्ट ऑफ लिव्हिंग या त्यांच्या तिसऱ्या पुस्तकाचे प्रकाशन दिनांक ०३ एप्रिल २०२५ रोजी रात्री ०८:०० वा. अहेमदनगर येथील सिटी लॉन्स या मंगल कार्यालयात मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लखनऊ विद्यापीठाचे सेवानिवृत्त कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे अध्यक्षस्थानी होते तर औरंगाबाद येथील सरस्वती भुवन महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ. ऋषिकेश कांबळे आणि विख्यात साहित्यिक डॉ. इकबाल मिन्ने यांची प्रमुख उपस्थिती होती.

इस्लाम द अल्टिमेट आर्ट ऑफ लिव्हिंग या ३६० पानी ग्रंथाचे प्रकाशन पूर्व वाचन करून करेक्शन करण्याचा बहुमान अर्शद शेख यांनी बीड शहरातील मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांना दिला होता. युसूफ़ यांनी आलेली जबाबदारी स्वीकारून ग्रंथाचे प्रकाशन पूर्व वाचन करून उत्कृष्ट करेक्शन केल्याने आर्किटेक्ट अर्शद शेख यांनी याप्रसंगी बीडहून कार्यक्रमात उपस्थित राहिलेले व्यावसायिक मिर्झा ख़िज़र बेग, जमात ए इस्लामी हिंद चे ज्येष्ठ पदाधिकारी सय्यद शफ़ीक़ हाश्मी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या उर्दू विभागाचे अशासकीय सदस्य सय्यद हसीन अख्तर, इंजि. मज़हर कादरी आणि मिर्झा इरतेकाझ अफ़ज़ल बेग यांच्या उपस्थितीत युसूफ़ यांच्या कार्याचे तोंड भरून कौतुक केले. यावेळी बोलताना युसूफ़ यांनी अर्शद भाई यांच्यामुळे इस्लाम आणि मुहम्मद पैगंबर यांच्या जीवनावर आधारित ग्रंथाचे करेक्शन करण्याची संधी मिळाली हे माझे भाग्यच म्हणावे लागेल असे म्हटले.

# भीमजयंतीनिमित्त आयोजित मेहंदी व रांगोळी स्पर्धा उत्साहात

**अंबाजोगाई प्रतिनिधी**

**संघर्षभूमी येथे आयोजित १४ दिवशीय भीमजयंती महोत्सवात आज मेहंदी व रांगोळी या दोन स्पर्धा घेण्यात आल्या. दोन गटात आयोजित या स्पर्धेत एकूण १३ स्पर्धकांनी सहभाग घेतला. तथागत बुद्ध पुतळा परिसरात या दोन्ही स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या.**



या स्पर्धांच्या सुरुवातीस तथागत बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्प अर्पण करण्यात आले. तसेच सामुहीक वंदना घेण्यात आली. नंतर या दोन्ही स्पर्धांना सुरुवात झाली. स्पर्धेत सहभागी असणाऱ्यांनी अत्यंत कल्पकतेने आपली मेहंदी व रांगोळी काढली. या स्पर्धेचे परिक्षक म्हणून सुमित्राताई पोटभरे , शोभाताई घोडके व सविताताई लोणारे यांनी गुणदान केले. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी संजय हतागळे , डॉ किर्तीराज लोणारे , पंकज भटकर यांनी विशेष प्रयत्न केले. याप्रसंगी ॲड शाम तांगडे , गुलाबराव गायवाड , वामन वाघचौरे , सुभाष घाडगे , प्रमोद सिताप आदींची उपस्थिती होती.



# डॉ. संजय तांदळे यांचा बेघरांच्या समवेत उत्साहात वाढदिवस साजरा

बीड । प्रतिनिधी

सामाजिक कार्यकर्ते तथा मातृभुमी प्रतिष्ठान बीड चे अध्यक्ष डॉ संजय तांदळे यांनी आपला ६१ वा वाढदिवस बीड शहरातील बेघर, निराश्रिताच्या समवेत अन्नदान करुन साजरा केला. सदैव लोकहिताच्या कार्यात सहभागी असणारे व्यक्तिमत्त्व आणि गोरगरिबांना सढळ हाताने मदत करण्याची वृत्ती असणारे व्यक्तिमत्त्व डॉ संजय तांदळे हे सदैव वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या मदतीसाठी तत्पर असतात. यावेळी शिक्षक संघटनेचे मार्गदर्शक प्रा. डी जी तांदळे , प्रा राजकुमार कदम, वाहतूक शाखेचे पोलिस उपनिरीक्षक विजय जाधवर, पोलीस उपनिरीक्षक वासुदेव मिसाळ, पोलीस उपनिरीक्षक राजु गुळभिले,मातृभुमी प्रतिष्ठान बीड चे अध्यक्ष डॉ संजय तांदळे, हफीज अब्दुल अजीज शेख, हफ़ीज मनौदिन शेख, बीड शहर बचाव मंचचे निमंत्रक नितीन जायभाये, लक्ष्मण चाटे, युवा दर्पण लाईव्ह चे संपादक राजेंद्र तिडके, मातोश्री विद्यालय वंजारवाडी चे मुख्याध्यापक बाळासाहेब नागरगोजे, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, पत्रकार संजय देवा कुलकर्णी, कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिव्हाळा केंद्रांचे संचालक अभिजित वैद्य यांनी केले तर आभार व्यवस्थापक राजु वंजारे यांनी मानले तर बेघरांचे जेवण बनविण्यासाठी छाया सरवदे यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमास बेघर निवारा केंद्रातील लाभार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# श्री योगेश्वरी मल्टिस्टेट को– ऑप क्रेडीट सोसायटी लि. अंबाजोगाईस ६५.३४ लाखांचा निव्वळ नफा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

समाजातील प्रत्येक घटकांची उन्नती या उक्तीवर चालणारी श्री योगेश्वरी मल्टिस्टेट को –ऑप क्रेडिट सोसायटी लि.ला आर्थिक वर्ष मार्च २०२५ अखेर रुपये ६५.३४ लाखाचा निव्वळ नफा झाल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष रिकबचंद सोळंकी यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे देतांना सांगितले . समाजातील प्रत्येक घटकांची उन्नती हेच या संस्थेचे ध्येय धोरण असून या धोरणावरच ही संस्था कार्यरत असल्याचे सांगितले. संस्थेस मिळालेल्या या संपूर्ण यशाचे श्रेय हे श्री योगेश्वरी मल्टिस्टेटचे संस्थापक राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शन व प्रेरणेला दिले. तसेच श्री योगेश्वरी मल्टिस्टेटचे उपाध्यक्ष शेख अन्वर शेख वली हसन , संचालक सुधाकर हरिश्चंद्र टेकाळे , ॲड लोमटे अनिल संभाजीराव, जाधव विलास सिद्राम, संकाये अप्पासाहेब त्रिंबकअप्पा,ॲड विलास शिवाजीराव लोखंडे, भागवत रामकृष्ण मसने,तसेच शेख मुक्तार फकीर अहमद, संचालिका आशालता विश्वजित वांजरखेडकर, सौ खडके मंदाकिनी बाजीराव त्याचबरोबर तज्ञ संचालक कांतीलाल नंदलाल शर्मा आणि सचिन लक्ष्मीकांत बजाज यांच्यासह संस्थेचे सर्व हितचिंतक सभासद ग्राहक , ठेवीदार आणि कर्जदार यांना दिले.



श्री योगेश्वरी मल्टिस्टेटचे अध्यक्ष रिकबचंद सोळंकी यांनी मार्च २०२५ अखेरची आर्थिक स्थिती विशद करतांना संस्थापक राजकिशोर मोदी यांच्यासह संस्थेच्या सर्व सभासद , ग्राहक ,आणि संस्थेच्या हितचिंतकांच्या सहकार्याच्या बळावरच हे शक्य झाल्याचे नमूद केले. मागच्या काही काळापासून अनेक बँका , पतसंस्था , मल्टिस्टेट सोसायटी या अनेक अडचणींना सामोरे जात आहेत .असे असताना देखिल श्री योगेश्वरी मल्टिस्टेट को ऑप क्रेडिट सोसायटी ही आपली नेत्रदीपक कामगीरी करत असल्याचे सोळंकी यांनी अभिमनाने सांगितले. यात संस्थेच्या ग्राहकांचा , ठेवीदारांचा , खातेदार आणि हितचिंतक यांचा मोलाचा वाटा असल्याचे देखील आवर्जून उल्लेखित केले. पुढे संस्थेच्या आर्थिक विवेनचनात मार्च २०२५ अखेर संस्थेचे एकूण १७२८ सभासद असल्याचे सांगितले .संस्थेचे भाग भांडवल एकूण रुपये ७० लक्ष असल्याचे सांगताना संस्थेचा स्वनिधीं हा रुपये ०३ कोटी असल्याचे वार्षिक अहवालात नमूद केले. तसेच मार्च २०२५ अखेर संस्थेकडे एकूण ठेवी रुपये २६.३३ कोटी एवढया असून संस्थेचे ग्राहकांना कर्जवाटप हे रुपये १८ कोटी एवढे झाले असल्याचे देखील अधोरेखित केले . श्री योगेश्वरी मल्टिस्टेट या संस्थेची एकूण गुंतवणूक ही अंबाजोगाई पिपल्स को–ऑप बँक आणि इतर संस्थेकडे मिळून रुपये १४.४३ कोटी एवढी असल्याचे सांगितले.संस्थेच्या वार्षिक अहवालात संस्थेचा एन पी ए ४.२८ एवढा दर्शविण्यात आला आहे. मल्टिस्टेट च्या माध्यमातून अनेक लहान मोठ्या व्यापारी व ग्राहकांचे हित जोपासण्यासाठी सदैव प्रयत्न केले जात आहेत.

तसेच २०२४–२०२५ या आर्थिक वर्षात ३१ मार्च २०२५ अखेर श्री योगेश्वरी मल्टिस्टेट या संस्थेने ६५.३४ लक्ष रुपये एवढा निवळ नफा मिळविला असल्याचे आवर्जून संस्थेचे अध्यक्ष रिकबचंद सोळंकी, उपाध्यक्ष तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष ढगे यांनी सांगितले . आजमितीला संस्थेच्या मुख्यालयात ७ कर्मचारी आणि २ नित्य निधी ठेव प्रतिनिधी कार्यरत आहेत. यामध्ये मुख्य शाखा व्यवस्थापक प्रदीप काकडे, विष्णु गुजर ,उमेश साखरे , वैभव देशमुख, संजुकुमार बिराजदार आणि अंकुश माने यांचा समावेश आहे . श्री योगेश्वरी मल्टिस्टेट या संस्थेच्या अंबाजोगाई आणि बसवकल्याण या दोन शहरात दोन शाखा कार्यरत असून या शाखांच्या माध्यमातून ग्राहकांना सेवा देत असल्याचे संस्थापक राजकिशोर मोदी व अध्यक्ष रिकबचंद सोळंकी यांनी सांगितले.

पान ६ वरून...

## स्पर्धा परीक्षेसाठी पालकांनी

प्राचार्या सारिका बजाज या होत्या. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग चांडक,उप मुख्याध्यापक सचिन गायकवाड, उपमुख्यध्यापिका ज्योती बनसोडे, व्यवस्थापिका ऐश्वर्या चांडक,स्पर्धा परीक्षा प्रमुख अंकिता तरकसबंद, तसेच पाचवी व सातवी चे विद्यार्थी पालक उपस्थित होते.आभार प्रदर्शन मनीषा डाके यांनी केले.

## तेजस्वी होण्यासाठी स्वतःला

संशोधक वृत्ती, जिज्ञासा आणि नवनिर्मितीच्या कुशलतेला वाव देतात. वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे भक्कम पुरावा आणि तर्कावर आधारित विचार करणे. वैज्ञानिक दृष्टिकोन हा शिकण्याची एक प्रक्रिया आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवण्यासाठी वैज्ञानिक पद्धत वापरली जाते. पुढे बोलतांना डॉ.इंगोले यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन हा तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ, प्रमानित, प्रयोगशील, दैनंदिन जीवनातील घटनांवर लागू केला जातो तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन हा विज्ञानाच्या पद्धतींवर आधारित असतो. आणि अशी वैज्ञानिक दृष्टीकोन अंगिकारलेली पिढी खऱ्या अर्थाने समृद्ध आणि विज्ञानवादी असते आणि हीच पिढी भारताला जागतिक महासत्ता बनवू शकते. त्यामुळे पालकांनी, शिक्षणसंस्थानी विद्यार्थ्यांना परंपरेला प्रश्न विचारणारी पिढी तयार केली पाहिजे असे आवाहन डॉ.इंगोले यांनी केले. यावेळी बोलतांना संस्थेचे अध्यक्ष रमेश कदम यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता ठासून भरलेली असते त्यांना संधी देण्याचे काम आपली संस्था करीत असल्याचे सांगितले. यावेळी महावीर गोडभरले, हेमंत धानोरकर, आर.डी.जोगदंड यांची समयोचित भाषणे झाली. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी केलेले विविध प्रयोग समजून घेत विद्यार्थ्यांना प्रयोगविषयी विविध प्रश्न विचारले. या विज्ञान प्रदर्शनात जवळपास ३०० विद्यार्थ्यांनी आपले प्रयोग सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिमा गुरसुलकर तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका शितल मोरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सचिव सुरेश कदम, सुशांत कदम व शाळेच्या सर्व कर्मचारीवृंदाने परिश्रम घेतले.

# एनएमएमएस परीक्षेत डॉ. सोनाजीराव रांजवण विद्यालयाचे १८ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी येथील,कै.डॉ. सोनाजीराव रांजवण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे १८ विद्यार्थी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकातील इयत्ता–८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाले आहेत त्यांचा सिदंफना शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मा.प्रतापभैय्या रांजवण साहेब यांच्या शुभहस्ते सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम शुक्रवार दि.४ एप्रिल २०२५ रोजी विद्यालयामध्ये आयोजित करण्यात आला याप्रसंगी गटशिक्षणाधिकारी बी.वाय.उजगरे साहेब उपस्थित होते.

याबाबत अधिक माहिती अशी की,एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत वडवणी तालुक्यातुन गुणवत्तेमध्ये सर्वप्रथम आल्या बद्दल कु.अनुष्का वैजेनाथ डीघे हिचा विशेष सत्कार यावेळी करण्यात आला.विद्यार्थ्यांनी शाळेच नावलौकिक केल्याबद्दल सर्व विद्यार्थी व पालक यांचे अभिनंदन सचिव प्रतापभैय्या रांजवण साहेब यांनी केले व मुख्याध्यापक यशवंतराव भोसले सर यांनी अभिनंदन करून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने इयत्ता–८ वीसाठी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी



**शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न**

एन.एम.एम.एस.शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येते या परीक्षेचा निकाल नुकताच संकेतस्थळावर ऑनलाईन जाहीर झाला आहे. कै.डॉ.सोनाजीराव रांजवण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील एन.एम.एम.एस. २०२४–२५ शिष्यवृत्ती परीक्षेसाठी १०९ विद्यार्थी बसले होते त्यापैकी ३५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर १८ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत या विद्यार्थ्यांना ५ वर्षा मध्ये बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण करण्यासाठी ६००००/– रुपयाची शिष्यवृत्ती मिळणार आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष मा.शिवाजीभाऊ रांजवण साहेब व सचिव मा.प्रतापभैय्या रांजवण साहेब विद्यालयाचे प्राचार्य यशवंतराव भोसले सर,पर्यवेक्षक जयदेव लांडे सर यांनी केले.तसेच या विदयार्थ्यांना मार्गदर्शन करणारे एन.एम.एम.एस.विभाग प्रमुख अविनाश शिंदे सर,बाबासाहेब जाधव सर,अंकुश गुंड सर व इयत्ता ८ वी चे वर्गशिक्षक केशव लंगे सर, सच्चीतानंद शिंदे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांचेही अभिनंदन करण्यात आले.

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना परीक्षेत

शिष्यवृत्ती साठी पात्र ठरलेले १८ विद्यार्थी पुढील प्रमाणे.

कु.डिगे अनुष्का वैजनाथ,दराडे अस्मिता अशोक,भागवत सिद्धी अरुण,उजगरे श्रावणी नितीन, कवचट समृद्धी दादासाहेब,आणेराव आदिती निलेश,चि.तिडके सुमित संजय,सावंत आनंद सूर्यकांत,सावंत सागर सूर्यकांत,डोरले आदित्य शिवाजी,पेशवे समर्थ कैलास, धार्मिक माऊली मसुराम, पवार रुद्राक्ष अनिल कुमार,राठोड जयदेव ज्ञानेश्वर साळवे,आरुष भिकाराम घुमरे केशव चक्रधर महाडिक आदर्श काशिनाथ, गार्डी परिक्षित सचिन या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे पालकासह सत्कार मान्यवरांच्या हस्ते करून अभिनंदन करण्यात आले व पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक तसेच पालक उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# कर्जमाफीसाठी राज्यभर आंदोलन उभे करणार



वाशीम : राज्य सरकारने कर्जमाफीचे आश्वासन देऊन शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. मात्र आता सरकारने शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले आहे. सरकारच्या धोरणामुळे झालेल्या नुकसानीमुळे शेतकरी मेटाकुटीस आला. कर्जमाफीसाठी राज्यभर शेतकऱ्यांना संघटित करून स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने मोठा लढा उभारण्यात येणार आहे, अशी घोषणा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक माजी खासदार राजू शेट्टी यांनी केली.

वाशीम जिल्ह्यातील देपूळ येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने कर्जमाफी, पीकविमा, सोयाबीन हमीभाव व नुकसानभरपाई आदी मुद्यांवर संत गजानन महाराज मंदिर प्रांगणात जाहीर सभा घेण्यात आली. सभेला संघटनेच्या युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष दामोदर इंगोले, प्रा. प्रकाश पोफळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी बोलताना शेट्टी यांनी शासनकर्त्यांच्या चुकीच्या धोरणांवर कडाडून टीका केली. आपला जो विश्वासघात झाला आहे तो मुकाट्याने सहन करायचा नाही. ज्यांनी आपल्याला फसवले त्यांना आता तुडवायला कमी करू नका, असे आवाहन केले. वाशीम जिल्ह्यात कारंजा येथील सभेत महायुतीचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी तीन पक्षांच्या वतीने बोलताना, जर आमचे सरकार आले तर आम्ही शेतकऱ्याचा सातबारा कोरा करू, असे सांगितले होते. मग सरकारने हा सातबारा कोरा का केला नाही, या प्रश्नाचे उत्तर सरकारने द्यायला पाहिजे. निवडून दिले तरी त्यांचे गुण बदलत नाहीत. तुम्ही बटण दाबताना डोके ठिकाणावर ठेवायला हवे होते, असेही त्यांनी शेतकऱ्यांना उद्देशून म्हटले. कर्जमाफी, शेतीमालाला भाव, अशा विविध मुद्यांवर सरकारकडून तुमची फसवणूक केली जात आहे, असे सांगत त्यांनी आगामी काळात लढ्यासाठी तयार राहण्याचे आवाहन केले. सभेत दामोदर इंगोले, प्रा. पोफळे यांनी मार्गदर्शन केले.

## मक्याच्या संकरीत जाती देतात हेक्टरी १०० क्विंटलपेक्षा अधिक उत्पादन



भारतीय कृषी संशोधन संस्थेने मक्याच्या अशा दोन जाती विकसित केल्या आहेत ज्या बंपर उत्पादन देतात आणि शेतकऱ्यांना यातून चांगले उत्पन्न मिळेल. अलीकडच्या काळात, सीव्हीआरसी (केंद्रीय विविधता प्रकाशन समिती) मार्फत आयआयएमआरकडून मक्याच्या २५ सिंगल क्रॉस हायब्रीड विकसित आणि प्रसारित करण्यात आलेल्या आहेत. मक्याचे हे नवीन वाण आहे डीएमआरएच १३०८ आणि डीएमआरएच १३०१. मक्याच्या या जातींनी राष्ट्रीय स्तरावर उत्पादकता वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आयआयएमआर इथेनॉल उत्पादन वाढवण्यासाठी मका उत्पादन वाढविणाऱ्या प्रकल्पावर काम करत आहे. शेतकऱ्यांनी जास्त उत्पादन देणाऱ्या मक्याच्या वाणांची लागवड करावी यासाठी प्रयत्न सुरु आहेत. मक्याच्या माध्यमातून शेतकरी ऊर्जा उत्पादक बनले पाहिजे.

डीएमआरएच १३०८ : रब्बी हंगामात लागवडीसाठी संकरित डीएमआरएच १३०८ ची शिफारस करण्यात आली आहे. १३०-१५० दिवसांत पक्व होणारा हा उच्च उत्पन्न देणारा रब्बी संकरित मका आहे, ज्यामध्ये दाण्यांचा रंग आकर्षक पिवळा आहे, करपा आणि खोड कुजव्या रोगास मध्यम प्रतिकारक आहे. गेल्या चार वर्षात, डीएमआरएच १३०८ मक्याच्या वाणाने मोठा वाटा उचलला आहे.

डीएमआरएच १३०१ : ही जात पूर्व उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, राजस्थान, गुजरात, छत्तीसगड आणि मध्य प्रदेशमध्ये रब्बी हंगामाच्या लागवडीसाठी शिफारस करण्यात आली होती. हा आणखी एक मध्यम कालावधीचा संकरित मका आहे. आकर्षक पिवळे दाणे, करपा आणि खोड कुजव्या रोगास मध्यम प्रतिकारक असलेली ही उच्च उत्पन्न देणारी जात आहे. हा संकरीत वाण शेतकऱ्यांना ६.५ ते १०.५ टन/हेक्टर उत्पादन देते. म्हणजेच, योग्य व्यवस्थापन केल्यास या जातीपासूनही १०० क्विंटल प्रति हेक्टरपेक्षा जास्त उत्पादन मिळू शकते.

## पुरेसा चारा, पाणी न मिळाल्यास जनावरांना होतात घातक आजार



उन्हाळ्यात चारा आणि पाण्याची टंचाई असते. जनावरांना चारा आणि पाणी पुरेशा प्रमाणात मिळत नाही. त्यामुळे जनवरांमध्ये विविध समस्या दिसून येतात. जनावरांमध्ये क्षार आणि जीवनसत्त्वाचा अभाव दिसून येतो, तर बऱ्याच वेळा जनावरांचा कुपोषणाने मृत्यू होतो. याकरिता पशुपालकाने चाऱ्याची सोय असेल त्या प्रमाणातच उत्पादक जनावरांचे संगोपन करणे गरजेचे आहे. पाणीटंचाईचा सर्वांत जास्त दुष्परिणाम नवजात वासरे, गाभण जनावरे आणि दुधाळ जनावरांमध्ये जाणवतो.

कुपोषण :जनावरांना वेळेवर व नियमित पुरेसा चारा व पाणी न मिळाल्यामुळे त्यांचे कुपोषण होते, तर बऱ्याच वेळा चरायला सोडल्यानंतर जनावरांना खाण्यास काहीच न मिळाल्यामुळे त्यांची उपासमार होते. खोल गेलेले डोळे व ऱ्हाट त्वचा, आखडलेल्या मांसपेशी ही कुपोषण व उपासमारीची लक्षणे आहेत. कुपोषण व उपासमार टाळण्यासाठी जातिवंत, उत्पादनक जनावरांचे चाऱ्याच्या उपलब्धेनुसार संगोपन करावे.

चयापचयाचे आजार :चयापचयाचे आजार सर्वसाधारणपणे आहारातून कमी ऊर्जेचा पुरवठा झाल्यामुळे उद्भवतात. चरायला बाहेर फिरणाऱ्या जनावरांना तर जास्तीच्या ऊर्जेची गरज असते. परंतु, टंचाई काळात ही गरज पूर्ण न होता उलट फिरण्यावर विनाकारण ऊर्जा खर्ची पडते. यामुळे जनावरांचे वजन दिवसेंदिवस घटत जाते. ही स्थिती मुख्यतः गाभण जनावरांमध्ये लवकर आढळून येते. ही समस्या टाळण्यासाठी आपल्या जनावरांना निकृष्ठ चाऱ्यासोबत योग्य प्रमाणात पशुखाद्य व क्षार मिश्रण द्यावे.

वनस्पतीपासून व खुरट्या चारा पिकापासून विषबाधा : अपुऱ्या चाऱ्यामुळे जनावरांची पूर्ण भूक भागत नाही. त्यांचे पोट भरत नाही, त्यामुळे जनावरं कोणतीही हिरवी वनस्पती, खुरटी झुडपं चारा समजून खातात. त्यामध्ये असणाऱ्या नायट्राईट, सायनाईड किंवा इतर घटकांमुळे जनावरांना विषबाधा होऊन जनावरं दगावतात. विषबाधेची लक्षणे दिसून आल्यास तत्काळ पशुवैद्यकाकडून उपचार करून घ्यावेत, जेणेकरून जनावरे दगावणार नाहीत.


आम्लधर्मीय अपचन : खराब वातावरण किंवा खुराकातील धान्याच्या प्रमाणातील बदल यामुळे आम्लधर्मीय अपचनाची समस्या उद्भवते. चाऱ्याची उपलब्धता कमी असल्यास किंवा निकृष्ट चारा असल्यास बरेच पशुपालक आपल्याकडील जनावरांना घरातील धान्य भरडून देतात, तसेच चंदी, खुराकातील घटकांचे, धान्याचे प्रमाण अचानक बदलतात, त्यामुळे आम्लधर्मीय अपचनाची समस्या निर्माण होते. यामध्ये पोट गच्च राहणे, हगवण लागणे, रवंथ न करणे, लाथा मारते, चारा न खाणे अशी लक्षणे दिसून येतात. तीव्र स्वरूपाच्या आम्लधर्मीय अपचनात जनावरं दगावण्याची शक्यता असते. या आजारावर पशुतज्ज्ञांच्या सल्ल्याने उपचार करावेत.

शरीरातील कॅल्शियम व फॉस्फरची कमतरता : जनावरांचे संगोपन मुख्यतः वाळला चारा, कडबा, शेतातील दुय्यम पदार्थांवर केले जात असेल तर जनावरांना शरीरपोषणासाठी कॅल्शियम, फॉस्फरसचा पुरवठा पुरेशा प्रमाणात व नियमित होत नाही. जनावरांची हाडे ठिसून होऊन कमकुवत होतात व जनावरांमध्ये उरमोडीसारखे आजार उद्भवतात. फॉस्फरसच्या कमतरतेमुळे खाल्लेल्या चाऱ्याचे व्यवस्थित पचन न होणे, अखाद्य वस्तू खाणे या समस्या उद्भवतात. जनावरांना व्यवस्थित चालता-फिरता येत नाही. गाभण जनावरांना तोंडावाटे कॅल्शियम व फॉस्फरस दिल्यावरही चांगला परिणाम दिसून येतो. जनावरांच्या आहारात क्षार मिश्रणाचा वापर जनावरांच्या शारीरिक स्थितीनुसार करणे फायदेशीर ठरते.

शरीरातील मॅग्नेशियमची कमतरता : मॅग्नेशियमची कमतरता मुख्यतः थोडा हिरवा चारा व जास्त वाळला चारा उपलब्ध असण्याच्या कालावधीत होते. पाण्याच्या कमतरतेच्या काळात ज्या पिकाची मुळे खोलवर विस्तारलेली असतात, ती जमिनीतून पाणी शोषून घेऊन जगण्याचा प्रयत्न करतात. या पिकांमध्ये पोटॅशियमचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे जनावरांच्या पोटात मॅग्नेशियमचे व्यवस्थित शोषण होत नाही. मॅग्नेशियमच्या कमतरतेमुळे फेफरे येणे, चक्कर येणे या समस्या उद्भवतात. वेळेवर उपचार न झाल्यास पॅरालिसीस होऊन जनावरांचा मृत्यू होतो. या समस्येमध्ये कॅल्शियम-मॅग्नेशियमयुक्त औषधे पशुतज्ज्ञांच्या सल्ल्याने द्यावीत.

# आंबा फळपिकांस द्या संतुलित खत मात्रा

आंबा लागवड सर्वसाधारणपणे कोणत्याही जमिनीमध्ये होऊ शकते, मात्र पाण्याचा निचरा होणारी जमिन असावी. सर्वसाधारणपणे जमिनीचा सामू ५.५ ते ७.५ पर्यंतच्या जमिनीमध्ये आंबा लागवड यशस्वी होते. आंब्याला लालसर जमिनीपासून ते नदीकाठच्या गाळाच्या, पोयट्याची जमिन उत्तम असते. जमिनीची खोली २ ते २.५ मी. असावी. आंब्याच्या योग्य वाढीसाठी जमिन मध्यम प्रकारची, पाण्याचा निचरा होणारी व पाण्याची पातळी २ मीटरच्या खाली असणारी असावी.चुनखडीचे प्रमाण १० टक्क्या पेक्षा कमी असावे. चोपण जमिन, खूप हलकी, कठीण मुरूम,पाषण असणारी जमिन आंब्यासाठी अयोग्य असते. डोगर उताराच्या जमिनीवर आंब्याचे उत्पादन कमी येते. खूप खोल, काळ्या भारी जमिनीत आंबा उत्पादन चांगले येत नाही. जमिनीचा उतार माफक असावा व पावसाचे पाणी साठवून राहू नये. खूप उताराच्या जमिनीत पाणी वाहून जाण्याचे प्रमाण अधिक असल्याने आंबा पिकास वारवार पाणी दयावे लागते. आंब्याची मुळे खोलवर जातील या दृष्टीने फुटणारा मुरूम असणारी जमिन आंब्यास मानवते.



फळबागेची आखणी आणि लागवड :जमिनीची चांगल्या पद्धतीने मशागत केल्यानंतर चौकोन पद्धतीने १० १० बाय १० मीटर अंतरावर आंब्याची लागवड करावी. एप्रिल किंवा मे महिन्यात शिफारस केलेल्या अंतरावर १ बाय १ बाय १ मीटर, आकाराचे खड्डे खोदताना मातीचा वरचा व खालचा थर वेगवेगळा ठेवावा. खड्डा खोदताना वरच्या व खालच्या थरातील माती वेगवेगळी टाकावी.खड्डे तीन आठवडे तापू द्यावे,जेणेकरून प्रखर सूर्यप्रकाशामुळे खड्ड्याचे निर्जंतुकीकरण होईल. मे महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यात खड्डे परत भरावे. खड्डे मातीने भरताना ते निर्जंतुकीकरण करून वाळलेला पालापाचोळा १५ से.मी. थरात भरावा. मातीमध्ये २०-२५ किलो चांगले कुजलेले शेणखत + २ ते ३ किलो गांडूळखत + २ ते ३ किलो लिंबोळी पेंड २५ ग्रॅम टायकोडर्मा जीवाणू + १५ ग्रॅम स्फुरद विरघळवणारे जीवाणू + २५ ग्रॅम अॅझोटोबॅकटर हे मिश्रण मिसळून घ्यावे. खड्डा जमिनीच्या वर ५ ते ७ से.मी उंच भरून ठेवावा.म्हणजे पावसाळ्याच्या सुरुवातीबरोबर लागवड करता येईल. वाळवी आणि इतर किडी पासून संरक्षण करण्यासाठी खड्ड्यात ५० ते ६० ग्रॅम लिंडेन किंवा फॉलीडॉल पावडर टाकावी. सधन लागवड ५ बाय ५ मीटर अंतर ठवून चौकोनी पद्धतीने लागवड केल्यास १ हेक्टर क्षेत्रात ४०० झाडे बसतात.

आंबा कलमांची निवड :फळबागांपासून काही वर्षाच्या मेहनतीनंतर उत्पन्न देणारे झाड न मिळाल्यास ते तोडून दुसरे लावणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. फळझाडांची कलमे, रोपांच्या निवडीवर फळांची गुणवत्ता आणि फळबागेचे एकूण यश अवलंबून असते म्हणून बागेकरिता उत्कृष्ट आणि गुणवत्ता माहित असलेली दर्जेदार आणि खात्रीशीर कलमे रोपे आणावी. आंबा लागवडीसाठी एक वर्ष वयाचे खात्रीशीर रोपवाटिकेतील जातीवत कलमाची निवड करावी. कृषि विद्यापीठ किंवा शासकीय रोपवाटिकेमधून शक्यतो रोपे आणावीत.शक्य नसल्यास आपल्या माहितीतील शासकीय परवानाधारक रोपवाटिकेतून कलमे /रोपे घ्यावीत. कलमांची निवड करताना ती किती उंच आहेत,यापेक्षा ती योग्य त्या जातीच्या मातृवृक्षापासून केलेली आहेत कि नाहीत याबाबींकडे अधिक लक्ष द्यावे. रोपे घेताना कलम बांधलेली आहेत व जोड पूर्णपणे जुळलेले आहेत याची खात्री करून घ्यावी.

त्याच बरोबर ती वाढीला जोमदार आहेत,निरोगी आहेत आपणास पाहिजे त्याच जातीची आहेत याची खात्री करूनच घेतली पाहिजे.आंबा रोपांची/कलमांची लागवड :प्रथम लागवड करण्यापूर्वी अगोदरच भरून ठेवलेल्या खड्ड्याच्या मध्यभागी कलमाच्या पिशवीच्या दोन्ही बाजूंवर उभा काप द्यावा व मुळाभोवती असलेला मातीचा गोळा न फुटता पॉलिथीन बॅग काढावी. मोकळा झालेला गोळा दोन्ही हातात धरून खड्ड्याच्या मधोमध ठेऊन हलकेच दाबावा व मोकळ्या हाताने माती भरून गोळ्याभोवती माती टाकावी.अगोदर हाताने व नंतर पायांनी दाबावी, हे करताना मातीच्या गोळ्यावर पाय पडणार नाही याची काळजी घ्यावी. आवशकता वाटल्यास हलकेसे पाणी द्यावे.आधारासाठी पश्चिम बाजूस ६ इंच अंतरावर ४ ते ५ फुट बांबूची काठी रोऊन त्यात कलम बांधावी.

आंब्याच्या प्रमूख जाती :हापूस, केशर, रत्ना, लंगडा, पायरी, वनराज, तोतापुरी, निलम, सिंधू.

`कलमांची निगा :पहिली तीन वर्ष आंबा कलमांना येणारा मोहोर काढून टाकावा. त्यामुळे झाडांची वाढ चांगली होते. चौथ्या वर्षापासून उत्पन्न घेण्यास सुरुवात करावी. कलमांचे बुरशीजन्य रोग व उन्हापासून सरंक्षण करण्यासाठी पावसाळ्यानंतर कलमांच्या बुंध्यावर बोर्डो पेस्ट लावावी. पहिले दोन - तीन वर्ष नियमित पाणी दयावे.

खतांचे व्यवस्थापन :आंबा कलम जोमाने वाढण्यासाठी व भरपूर फळे येण्यासाठी दरवर्षी कलमाच्या वयोमानानुसार तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे खते देणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे जून-जुलै महिन्यात संपूर्ण शेणखत, संपूर्ण स्फूरद व पालाशची मात्रा द्यावी व नत्राची मात्रा एक किंवा दोन हप्त्यात विभागून द्यावी. खताची मात्रा देताना बांगडी पद्धतीने द्यावीत. मध्यान्ही झाडाची सावली जेवढ्या भागावर पडेल त्या क्षेत्राच्या मधोमध १ ते १.५ मीटर दूर,१५ से. मी. खोल आणि ३० ते ४५ से.मी. रुंद चर घेऊन गोलाकार पद्धतीने द्यावीत. प्रथम चरात पालापाचोळा व शेणखत टाकून नंतर रासायनिक खते सर्व बाजूनी सारखी टाकावी नंतर चर मातीने बुजवावा. पहिल्या वर्षी ३०० ग्रॅम युरिया + ३०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट + २०० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश द्यावे. कलमाचे वय वाढत जाईल तसे हे प्रमाण प्रतिवर्षी १ घमेले शेणखत +३०० ग्रॅम युरिया + ३०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट + २०० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश या प्रमाणात वाढवावे. पूर्ण वाढलेल्या आंब्याच्या झाडास ५० किलो शेणखत/कंपोस्ट , दीड किलो नत्र, अर्धा किलो स्फूरद व अर्धा किलो पालाश प्रती झाड जून- जुलै महिन्यात व नत्र दोन समान हप्त्यात द्यावे. म्हणजेच ३ किलो युरिया, ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट + २ किलो म्युरेट ऑफ पोटॅश द्यावे. युरिया विभागून द्यावा.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६५६ : शिवाजीमहाराजांनी चंद्रराव मोरे यांचा पराभव करुन रायगड किल्ला ताब्यात घेतला. चैत्र व. ७
१६५६ : चंद्रराव मोरे याचा शिवाजी महाराजांनी पराभव करुन रायगड किल्ला सर केला व आपली राजधानी केली.
१८९६ : आधुनिक ऑलिम्पिक खेळांची ग्रीसमधील अथेन्स येथे सुरूवात झाली. ग्रीक सम्राट थेडोसियस (पहिला) याने घातलेल्या बंदीमुळे १५०० वर्षे हे खेळ बंद होते.
१९१७ : पहिले महायुद्ध अमेरिकेने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९१९ : रौलेट अॅक्टविरुध्द हरताळ पाळण्यात आला.
१९३० : प्रसिद्ध दांडीयात्रेनंतर गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह सुरू केला.
१९६५ : व्यापारी उपयोग करता येईल अशा प्रकारे संदेशवहन करण्याची सोय असलेला 'अर्ली बर्ड' हा उपग्रह अमेरिकेने अंतराळात सोडला. या उपग्रहामुळे माहिती व करमणुकीच्या क्षेत्रात प्रचंड क्रांती घडली.
१९६६ : भारतीय जलतरणपटू मिहीर सेन यांनी भारत व पाकिस्तानला जोडणारी पाल्कची सामुद्रधुनी पोहून पार केली. इंग्लिश खाडीसह जगातील अनेक खाड्या त्यांनी पार केल्या होत्या.
१९८० : भारतीय जनता पक्षाची स्थापना झाली व अटलबिहारी वाजपेयी तिचे पहिले अध्यक्ष झाले. यानंतर १९८४ मध्ये झालेल्या ८ व्या लोकसभा निवडणूकांमध्ये या पक्षाला दुसर्या क्रमांकाची मते मिळुनही फक्त दोनच जागा मिळाल्या!
१९९८ : स्तनांचा कर्करोग बरा करणार्या टॅमॉक्सीफेन या औषधाच्या चाचणीचे निकाल जाहीर करण्यात आले. या औषधामुळे होणार्या दुष्परिणामांमुळे गर्भाशयाच्या कर्करोगाची शक्यता वाढते, असे जाहीर करण्यात आले.
१९९८ : भारतापर्यंत सहज पोहोचू शकणार्या मध्यम पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांची पाकिस्तानने यशस्वी चाचणी केली.
१९९८ : पाकिस्तानने मध्यम पल्ल्यांच्या क्षेपणास्रांची (भारतावर मारा करण्याची क्षमता असणारी) चाचणी केली.
२००० : 'मीर' या रशियाच्या अंतरिक्ष प्रयोगशाळेला जीवदान देण्यासाठी सोडलेले 'सोयूझ' हे अंतराळयान 'मीर'ला भेटले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७३ : जेम्स मिल स्कॉटिश तत्त्ववेत्ते, इतिहासकार व अर्थशास्त्रज्ञ (मृत्यू: २३ जून १८३६)
१८६४ : सर विल्यम हार्डी ब्रिटिश जीवरसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: २३ जानेवारी १९३४)
१८८६ : ब्रिटीश कालीन भारतातील सर्वात मोठी रियासत हैदराबाद येथील निजाम संस्थेचे शेवटचे शासक निजाम उस्मान अली खान यांचा जन्मदिन.
१८९० : अली सिकंदर ऊर्फ 'जिगर मोरादाबादी' उर्दू कवी व शायर (मृत्यू: ९ सप्टेंबर १९६०)
१८९० : फोक्कर एअरक्राफ्ट मॅनुफॅक्चर चे निर्माते अँटनी फोक्कर यांचा जन्म. (मृत्यू: २३ डिसेंबर १९३९)
१८९२ : डग्लस एअरक्राफ्ट कंपनी चे निर्माते डोनाल्ड विल्स डग्लस यांकॅह जन्म. (मृत्यू: १ फेब्रुवारी १९८१)
१९०९ : जी. एन. जोशी भावगीतगायक व संगीतकार. एच. एम. व्ही. या कंपनीत काम करत असताना त्यांनी अनेक नवीन गायकांना संधी देऊन त्यांच्या ध्वनिमुद्रिका काढल्या. (मृत्यू: २२ सप्टेंबर १९९४)
१९१७ : 'काव्यतीर्थ' हणमंत नरहर जोशी तथा कवी सुधांशु मराठी कथाकार व कवी (मृत्यू: १८ नोव्हेंबर २००६)
१९१९ : रघुनाथ विष्णू पंडित कोंकणी कवी (मृत्यू:)
१९२७ : विष्णू महेश्वर ऊर्फ 'व्ही. एम.' तथा दादासाहेब जोग उद्योजक (मृत्यू: २८ जून २०००)
१९२८ : जेम्स वॉटसन फ्रान्सिस क्रीक व मॉरिस विल्कीन्स या जोडीदारांसह डीएनएची संरचना स्पष्ट करणारे नोबेल पारितोषिक (१९६२) विजेते जैवरसायनशास्त्रज्ञ
१९३१ : रमा दासगुप्ता तथा सुचित्रा सेन बंगाली व हिन्दी चित्रपट अभिनेत्री. उत्तमकुमारबरोबर त्यांची जोडी बंगाली चित्रपटांत चांगलीच गाजली. (मृत्यू: १७ जानेवारी २०१४ कोलकता, पश्चिम बंगाल)
१९५६ : दिलीप वेंगसरकर क्रिकेटपटू व प्रबंधक
१९७१ : प्रसिद्ध चित्रपट अभिनेते संजय सुरी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

११९९ : रिचर्ड (पहिला) इंग्लंडचा राजा (जन्म: ८ सप्टेंबर ११५७)
१९५५ : धर्मभास्कर विनायक महाराजा मसूरकर यांचे निधन.
१९७३ : भारतीय केरळ साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त निबंध लेखक मल्याळम साहित्य समिक्षक कारिककट्ट मराठू कुट्टीकृष्ण मारार यांचे निधन.
१९८१ : शंकर धोंडो तथा मामा क्षीरसागर मानवधर्माचे उपासक. विदर्भातील दर्यापूर येथील प्रबोधन विद्यालय, कोल्हापूरचा ग्रामसेवाश्रम व कोरगावकर धर्मादाय संस्था, वरोड्याचे आनंदवन, माधानचे कस्तुरबाधाम, नागपूरचा मातृसेवासंघ, देवरुखचे मातृमंदिर इ. अनेक संस्थांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते.
१९८३ : जनरल जयंतीनाथ चौधरी भारताचे लष्करप्रमुख (१९६२ १९६६), हैदराबादचे लष्करी प्रशासक (१९४८ १९४९) व भारताचे कॅनडातील राजदूत, पद्?मविभूषण (जन्म: १० जून १९०८)
१९८९ : पन्नालाल पटेल ज्ञानपीठ पारितोषिक विजेते गुजराथी कथा-कादंबरीकार. चारशेहून अधिक कथांचे २५ संग्रह, ३२ कादंबर्या, ५ नाटके, बालसाहित्य यासारखी विपुल साहित्यसंपदा त्यांच्या नावावर आहे. (जन्म: ७ मे १९१२ मांडली, डुंगरपूर, राजस्थान)
१९९० : माकप नेते व राजकारणी तसचं कामगार संघटनेचे नेते भालचंद्र त्र्यंबक रणदिवे यांचे निधन.
१९९२ : आयझॅक असिमॉव्ह अमेरिकन जीवरसायनशास्त्रज्ञ आणि विज्ञानकथालेखक (जन्म: २ जानेवारी १९२०)
२००१ : भारताचे माजी ६ वे उपपंतप्रधान चौधरी देवीलाल यांचे निधन.

# महाबोधी बौद्ध विहार आमचे, हिंदू महंतानी ताबा सोडावा !!

## बौद्ध भिक्खु संघासमवेत बौद्ध समाजाची मागणी ;बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन





बीड। प्रतिनिधी

बिहार राज्यातील बोधगया येथील महाबोधी बौद्ध महावीहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे.या मागणीसाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शनिवार (दि.५) रोजी एक दिवशीय धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व भिक्खु पय्यातीस महाथेरो, भिक्खु धम्मशिल थेरो, भिक्खु, पय्यावर्धन,भिक्खु अचलानंद, आर्या मेत्ताजी, भिक्खु धम्मपाल तसेच आंबेडकरी प्रेमी व बौद्ध बांधव बीड यांनी केले होते.

बीड जिल्हाधिकारी यांच्या मार्फत राष्ट्रपती यांना, दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, तथागत भगवान गौतम बुद्ध यांना बोधगया येथे ज्ञान प्राप्ती झाली. त्या ठिकाणी प्रियदर्शी चक्रवर्ती राजा सम्राट अशोक यांनी महाविहाराची निर्मिती केली होती. तेथील जागा संपूर्ण जगाला प्रेरणास्थान असून हाच भारत देशाचा सर्वात मोठा जगामध्ये सन्मान समजला जातो. परंतु १९४९ ला बुद्धिस्ट टेम्पल कायदा करुन त्या ठिकाणी चार बौद्ध भिक्खु, चार ब्राह्मण व एक त्या ठिकाणचे जिल्हाधिकारी अशी कमिटीची निर्मिती करण्यात आली.त्यामुळे बौद्ध समाजावर हा एकप्रकारे अन्याय आहे. वास्तविक पाहता बौद्ध विहारामध्ये बौद्ध शिवाय इतर कोणालाही समितीवर सदस्य घेण्याचे काहीही कारण नाही. परंतु जगभरातून महाबोध्दी बुद्ध विहार येथे कोठ्यावदी रुपये दान मिळत असल्याने तो पैसा लुबाडण्यासाठी सरकारने अशा पद्धतीची कमिटी स्थापन केलेली आहे. भारतीय राज्य घटनेच्या कलम १३ नुसार १९५० च्या आधीचे सर्व कायदे रद्द करण्यात आलेले आहेत. तरी देखील बौद्ध टेम्पल कायद्यात शासन कोणताही बदल करत नाही. हा बौद्ध समाजावर अन्याय आहे. तरी महामहिम राष्ट्रपतीजी यांना निवेदन करण्यात येते की, बुद्धिस्ट टेम्पल ॲक्ट रद्द करुन महाबोधी महाविहार बुद्ध गया हे बौद्धांच्या ताब्यात देण्या यावे. अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी बौद्ध समाजाची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### वडवणी ते बीड लाँग मार्च

वडवणी ते बीड जिल्हाधिकारी कार्यालय इथपर्यंत महाबोधी बौद्ध विहार मुक्तीसाठी लाँगमार्च काढण्यात आला होता.लोककवी वामनदादा कलामंचकडून या लाँगमार्चचे आयोजन करण्यात आले आहे. या मार्चमध्ये बौद्ध समाज मोठ्या संख्येने सहभागी झाला होता.

# महाबोधी महाविहार मुक्तीसाठी स्वाक्षरी मोहीमेस बीडमध्ये सुरुवात




बीड। प्रतिनिधी

आज बीडमध्ये सम्राट अशोक यांच्या जयंतीनिमित्त महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन भव्य निदर्शने पूज्य भन्तेजी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. त्यावेळी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.प्रकाश आंबेडकर व प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर यांच्या आदेशान्वये स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली.

यावेळी वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनामध्ये मी सहभागी असल्याचा सेल्फी पॉइंट तयार करण्यात आला. त्यास प्रचंड प्रतिसादही मिळाला आणि स्वाक्षरी मोहिमेला गती मिळाली यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर, वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष उमेश तूळवे, सह-संघटक अर्जुन जंवजाळ, बीड तालुका अध्यक्ष किरण वाघमारे, बीड शहराध्यक्ष लखन जोगदंड मिलिंद सरपते, युवा नेते प्रेम कांबळे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.ही स्वाक्षरी मोहीम ३ एप्रिल २०२५ रोजी सुरू झाली असून, १४ एप्रिल २०२५ पर्यंत चालणार आहे. बोधगया महाविहार कायदा १९४९ रद्द करावा आणि बोधगया येथील महाबोधी महाविहाराचे नियंत्रण आंतरराष्ट्रीय बौद्धांना ताब्यात द्यावे. यासाठी स्वाक्षरी मोहीम सुरू आहे.

# शिक्षण विभागाचा तुघलकी कारभार

## कडक उन्हाळ्यात परीक्षा दुसरीकडे पोषण आहाराची भ्रांत




बीड। प्रतिनिधी

पहिली ते नववीच्या परीक्षा पद्धतीत एकवाक्यता आणण्यासाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परीषदेचे संचालक राहुल रेखावर यांनी भर उन्हाळ्यात परीक्षा घेण्याचा घाट घातला असून राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांसाठी इयत्ता पहिली ते नववीपर्यंतच्या परीक्षा ०८ एप्रिल ते २५ एप्रिल या कालावधीत घेण्यात याव्यात असे परिपत्रक काढण्यात आले आहे. केंद्राच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिलेल्या पत्राचा संदर्भ देत महसूल मंत्रालयाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने काढलेल्या आदेशानुसार उष्माघाताचा प्रभाव कमी करण्यासाठी वर्गखोल्या थंड असाव्यात तसेच शालेय पोषण आहार अंतर्गत सरबत, ताक ,ओआरएस पॅकेट आदि शितपेये देण्यात यावे.असे आदेश काढण्यात आले आहेत. एकीकडे वेळेवर अनुदान न मिळणा-या पोषण आहाराचीच भ्रांत असणाऱ्या मुख्याध्यापक शिक्षकांनी व्यवस्था करायची कुठुन असा प्रश्न पडला आहे. दुसरीकडे बीड जिल्ह्यातील १४२० शाळांमध्ये वीजपुरवठाच नाही तर काही शाळांमध्ये पंखे नाहीत त्यामुळे वर्गखोल्या थंड ठेवण्यासाठी कुलर कुठुन आणायचे आणि जिल्हा परिषदेच्या ३१७ शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याचा व स्वच्छतागृहांचा अभाव असताना शितपेये कुठुन देणार असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी करत शासनाच्या तुघलकी कारभाराचा निषेध केला आहे.

ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी आजही पायी, सायकल किंवा तासन तास एसटीची वाट पहात उभे असतात.अशा विद्यार्थ्यांना उष्माघाताचा त्रास झाला तर त्याची जबाबदारी शाळा किंवा शिक्षण विभाग घेणार आहे का?? असा प्रश्न पालकांनी उपस्थित केला आहे. उष्माघाताचा प्रभाव टाळण्यासाठी वर्गखोल्या थंड ठेवण्याचे आदेश दिले आहेत. बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या २४८० शाळांपैकी ७७२ शाळांना वीज पुरवठाच करण्यात आलेला नाही.

तर ६२० शाळांमधील वीजपुरवठा महावितरण कर्मचाऱ्यांनी वीज देयके थकीत असल्याने वीज पुरवठा खंडित करून मीटर काढून नेले आहे. तब्बल १३९२ शाळांमधील विद्यार्थ्यांचे कॉम्प्युटर स्मार्ट टीव्ही डिजिटल बोर्ड एलईडी आधी उपकरण व साहित्य धुळकात पडत असून एखादी विद्यार्थ्यांचे डिजिटल अंधारात आहे.वर्गखोल्या थंड करण्यासाठी कुलर लावावे लागतील आणि वीजपुरवठाच नाही,साधे पंखे नाहीत तर वर्गखोल्या थंड ठेवणार कशा?? एसी केबिनमध्ये आणून एसी गाड्या मधुन फिरणाऱ्या आधिका-यांना उन्हाची तिव्रता काय समजणार असा प्रश्न डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

# समाजाला खऱ्या अर्थाने चिंतनाची गरज

## जयभिम महोत्सवात भिक्खु धम्मशिल थेरोंची धम्मदेसना



बीड। प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना समजून घेण्यासाठी खऱ्या अर्थाने चिंतनाची आवश्यकता आहे.त्याशिवाय बाबासाहेब आंबेडकर तुम्हाला समजणार नाहीत.त्यामुळेच समाजाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात करावेत.असे विचार पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो यांनी धम्मदेसना कार्यक्रमात व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे शुक्रवार (दि.४) रोजी रात्री ७ वाजता धम्मदेसना आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो, भिक्खु पय्यावर्धन बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पी.व्ही.बनसोडे, प्रमुख पाहुणे म्हणून संदिप उपरे, अमरसिंह ढाका उपस्थित होते.

उपस्थित आंबेडकरी जनतेला संबोधित करतांना भिक्खु धम्मशिल थेरो म्हणाले की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक क्रांती केल्या असून बौद्ध धम्म ही सर्वांत मोठी क्रांती केली. जयंती हा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम नसून चळवळीचे ऊर्जा केंद्र आहे. त्यामुळे जयंती नीटपणे समजून घेतली पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्ञानाचा सूर्य आहेत.या सूर्याने मानवाला मानवाचे अधिकार मिळवून दिले. बाबासाहेबांनी विचारांशी कधीही तडजोड केलेली नाही.असेही भिक्खु धम्मशिल थेरो म्हणाले. भिक्खु पय्यावर्धन म्हणाले की, बीडच्या जयभिम महोत्सवाने क्रांतीचा दिवा तेवत ठेवला आहे.

खरंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा त्याग, समर्पण, विसरता कामा नये. कारण आज आपण जे काही आहोत ती, बाबासाहेबांचीच पुण्याई आहे.असे भिक्खु पय्यावर्धन म्हणाले.या धम्मदेसना व्याख्यानाचे प्रास्ताविक गौतम चोपडे सूत्रसंचलन सुनिल डोंगरे,सचिन वडमारे, आभार ॲड.राजेश शिंदे यांनी केले.यावेळी बौद्ध उपासक-उपासिका यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.हा धम्मदेसना कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने मोलाचे परिश्रम घेतले.

# अर्धामसला मस्जिद बॉम्बस्फोट प्रकरणी आंदोलनास

## मोठ्या संख्येने उपस्थित राहावे-शेख

पाटोदा। प्रतिनिधी

सोमवारी ७ एप्रिल २०२५ रोजी सकल पाटोदा मुस्लिम समाजाच्या वतीने तहसील कार्यालय पाटोदा येथे धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून १.अर्धामसला मस्जिद बॉम्बस्फोट प्रकरणी सखोल चौकशी आणि कठोर कारवाई करण्यात यावी मागणी साठी पाटोदा मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने अर्धामसला मस्जिद बॉम्बस्फोट प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

तसेच २ वक्फ दुरुस्ती बिल रद्द करणे: वक्फ दुरुस्ती बिलाच्या संदर्भात मुस्लिम समाजाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. समाजाच्या मते, या बिलामुळे वक्फ क्षेत्रात गैरव्यवस्था होऊ शकते. त्यामुळे, या बिलाला रद्द करण्याची मागणी आहे. त्यामुळे सकल पाटोदा मुस्लिम समाजाने सर्व समाज बांधवांना या धरणे आंदोलनात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. या आंदोलनात सहभागी होऊन वरील मुद्द्यांवर सरकारचा लक्ष वेधण्यासाठी एकजूट दाखवण्याचे आवाहन येवानेते इम्रानभाई शेख यांनी केली असून सोमवारी ७ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता तहसील कार्यालय पाटोदा येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते युवानेते इम्रानभाई शेख यांनी केली आहे

# शिवाजीराव सुत्रावे यांचे निधन

परळी। प्रतिनिधी



येथील भावसार समाजाचे सामाजीक कार्यकर्त,रेडीमेड गारमेन्टचे सु प्रसिध्द व्यापारी श्री वैजीनाथराव सुत्रावे यांचे तसेच डॉ विजयकुमार यांचे बंधु व पत्रकार द्वारकादास फटाले बीड याचें जावई शिवाजीराव सुत्रावे यांचे दि.२ रोजी अल्पशा आजाराने लातूर येथे उपचार सुरू असताना खाजगी रूग्णालयात दुखःद निधन झाले,गुरूवारी सकाळी १०वाजता परळी येथे त्यांचे पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.याप्रसंगी सर्वस्तरातील मंडळी , व्यापारी पत्रकार, राजकिय, सामाजिक, क्षेत्रातील मंडळी आप्तेष्ट नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्याचेमागे आई,दोन भाऊ,पत्नी १मुलगा मुलगी व नातवंड असा परिवार आहे.

# बँकिंग क्षेत्रातील परीक्षेची तयारी या विषयावर व्याख्यान

पाटोदा । प्रतिनिधी

जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय पाटोदा आणि बलभीम महाविद्यालय बीड, अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानामध्ये संकल्प एज्युकेशन, छत्रपती संभाजीनगर या संस्थेचे संचालक मा. इंजि. आकाश जाधव सर यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या व्याख्यानामध्ये बँकिंग क्षेत्रातील वेगवेगळ्या पदासाठी कशाप्रकारे तयारी करावी लागते आणि बँकिंग क्षेत्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणात रोजगार संधी उपलब्ध असल्याचे आपल्या व्याख्यानातून व्यक्त केले. कोणत्याही क्षेत्रातील पदवीधर बँकिंग क्षेत्रातील परीक्षेची तयारी करू शकतो आणि या क्षेत्रातील परीक्षा नियमित होत असल्याने विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रामध्ये करिअर करण्याची मोठी संधी असल्याचे त्यांनी सांगितले.

हा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. सोमनाथ घाडगे सर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून बलभीम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष उंदरे सर हे होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गोवर्धन वायसे यांनी केले, प्रास्ताविक प्रा. डॉ. सोमेश्वर बाबर सर यांनी केले तर या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. डॉ.शिवाजी काकडे यांनी केले. या कार्यक्रमामध्ये दोन्ही महाविद्यालयाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या पीक कर्जाची सक्तीची वसुली थांबवा, अन्यथा रुमने हातात घेऊ- जिल्हाप्रमुख उल्हास गिराम

## रांजणी येथील आत्महत्याग्रस्त कुटुंबाची गिराम यांनी घेतली भेट



बीड। प्रतिनिधी

जिल्ह्यातील शेतकरी मागील दोन वर्षापासून आसमानी आणि सुलतानी संकटा आहे. आर्थिक अडचणीत असताना शेतकऱ्यांनी घेतलेल्या पीक कर्जाची बँका सक्तीची वसुली करत आहेत. ही सक्तीची वसुली बँकांनी तात्काळ थांबवावी अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष हातात रुमणे घेऊन, बँक अधिकारी आणि वसुली कर्मचाऱ्यांना पळता भुई करतील. असा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी दिला आहे.गेवराई तालुक्यातील रांजणी येथील शेतकरी स्व.आकाश श्रीराम रोकडे यांनी आत्महत्या केली. जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी त्यांच्या कुटुंबाची सांत्वनपर भेट घेऊन कुटूंबाला आधार दिला.

जिल्ह्यातील शेतकरी बांधव गेल्या अनेक वर्षापासून या ना त्या कारणाने आर्थिक संकटात सापडला आहे कधी पीक जोमात असताना अवकाळी चा फटका तर कधी शेतीउत्पादन साहित्याची झालेली प्रचंड वाढ यामध्ये शेतकऱ्याचे आर्थिक गणित पार कोसळले आहे. अशातच सोयाबीन कापसाला अपेक्षित दर न मिळाल्यामुळे मागील दोन वर्षापासून कापूस व सोयाबीन हे बऱ्याच शेतकऱ्यांनी घरीच साठवून ठेवला आहे. शेतीतील वाढता खर्च, वाढलेली मजुरी दर, अवकाळी आणि सरकारचे दुर्लक्ष यामुळे शेतकरी दुःखाच्या गर्तेत ओढला जात आहे. शेतातील पीक हमीभाव येईपर्यंत प्रतिक्षा करावी की कमी दराने विकावा या विवंचेत शेतकरी सापडला असता, राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार नुकतेच जाहीर केले, 'कर्जमाफी होणार नाही पीक, कर्ज तात्काळ भरा', या आदेशामुळे बँक कर्मचारी शेतकऱ्याकडून सक्तीची वसुली करत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येत वाढ होऊ शकते, तशीच घटना गेवराई तालुक्यातील रांजणी येथे घडली असून त्या ठिकाणी शेतकरी असलेले आकाश श्रीराम रोकडे यांनी बँकेच्या तगाद्याला कंटाळून आत्महत्या केली या आत्महत्येला सरकार आणि प्रशासनच जबाबदार आहे. अशा परिस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष शेतकऱ्यांच्या सोबत असून शेतकऱ्याना वसुलीसाठी वेठीस धरल्यास हातात रुमणे घेऊन विरोध करू असे प्रसिद्धी पत्रकात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास भैया गिराम यांनी केले. या सांत्वनपर भेटी दरम्यान शिवसेना जिल्हा समन्वयक भाई संजय महाद्वार, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, तालुका प्रमुख अजय दाभाडे, नवनाथ प्रभाळे, सहशिवसैनिकउपस्थित होते.

# युसूफवडगांव येथे रामनवमी निमित्ताने केले १७२ जणांनी रक्तदान



युसूफवडगांव।प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे श्रीराम जन्मोत्सव व स्व.मेजर शिवराज खरबड यांच्या स्मरणार्थ आधार युवा मंचच्या वतीने आयोजित रक्तदान शिबीरामध्ये तरूणांनी उत्स्फूर्त पणे सहभागी होत तालुक्यातुन ग्रामीण स्तरावर नवीन उच्चांक करत १७८ जणांनी रक्तदान केले आहे.

युसूफवडगांवचे ग्रामदैवत असलेले प्रभु श्रीराम यांच्या जन्मोत्सवा निमित्त गेल्या १४ वर्षापासून आधार युवा मंचच्या वतीने सामाजिक उपक्रम व सामाजिक बांधिलकी म्हणुन भव्य अशा स्वरूपात रक्तदान शिबीर आयोजित करण्यात येते याही वर्षी आधार युवा मंचच्या वतीने दि.५ एप्रिल रोजी गावातील हनुमान मंदिरात भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.यावेळी गावातील नव तरूणांनी उत्स्फूर्त पणे यात आपला सहभाग नोंदवुन तब्बल १७८ जणांनी रक्तदान केले.हे रक्तदान शिबीर यशस्वी होण्यासाठी आधार युवा मंचच्या सर्व सदस्य मेहनत घेत रक्तदान शिबीर यशस्वी केले.

# आष्टीत स्कुल बसला अपघात विद्यार्थी जखमी

आष्टी । प्रतिनिधी

शाळेला विद्यार्थी घेऊन जाणाऱ्या स्कूल बस झाडाला धडकल्याची घटना आष्टी शहराजवळ घडली. आष्टी येथील अहिल्यानगर - बीड रस्त्यावरील गणपतीजवळ लोकनेते गोपीनाथराव मुंडे चौकात बेलगाव फाटा येथे हा अपघात झाला. वटणवाडी येथून शाळेला विद्यार्थी घेऊन ही स्कूल बस आष्टीकडे येत होती. सकाळच्या सत्रातील शाळा असल्याने चालक मुलाला घेऊन चालला होता.

अचानक समोर आलेल्या स्विफ्ट कारला वाचविण्याच्या प्रयत्नात चालक झाडावर जाऊन आदळला.हा अपघात इतका भयानक होता की यामुळे विद्यार्थी घाबरले तर अचानक झालेल्या या घटनेमुळे विद्यार्थ्यांना धक्का बसला.यामधे



## आ.सुरेश धस यांनी घटनास्थळी दिली भेट

काही विद्यार्थी किरकोळ जखमी झालेले आहेत.वाहन चालकाला चांगलाच मार लागलेला आहे.जखमींवर आष्टी येथील ग्रामीण रुग्णालय उपचार करून घरी पाठविण्यात आले असून सदर घटनेची माहिती मिळताच आ.सुरेश धस यांनी ग्रामीण रुग्णालयात धाव घेत जखमी विद्यार्थी आणि पालकांशी संवाद साधला.महामार्गावरील असणाऱ्या अनधिकृत बॅनर आणि काही दुकानाच्या अतिक्रमण करून लावलेल्या जाहिरातींच्या फलकाचा वाहन चालकांना नेहमीच अडथळा होत असल्याचे प्रत्यक्षदर्शनी असलेल्यांनी सांगितल्यावर आ.सुरेश धस यांनी तात्काळ स्थानिक ग्रामपंचायत,नगरपंचायत व पोलिस प्रशासनाला सूचना देत हे फलक तातडीने काढण्यात यावेत असे सांगितले आहे.

# प्रा.डॉ.संतोष रणखांब यांना झेड. एस.आय.चे सुवर्ण पदक जाहीर

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठीवाडी येथील रहिवासी व सध्या कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ येथे प्राणीशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असलेले प्रा.डॉ.संतोष रणखांब यांना भारतीय प्राणिविज्ञान मंडळ (झेड.एस.आय. ) च्या वतीने वतीने प्रोफेसर बी. एन.पांडे सुवर्णपदक देऊन लखनऊ विद्यापीठ लखनऊ, (उ.प्र) येथे प्राणीशास्त्र विभागात होणाऱ्या राष्ट्रीय परिषदेत सन्मानित करण्यात येणार आहे.



तालुक्यातील मोठीवाडी येथील रहिवासी असलेले प्रा.डॉ.संतोष रणखांब यांना झूलॉजिकल सोसायटी ऑफ इंडिया यांच्या वतीने त्यांनी प्राणीशास्त्र विषयात केलेल्या चांगल्या कार्याबद्दल प्रोफेसर बी एन पांडे सुवर्णपदक देऊन २४ ते २६ एप्रिल २०२५ दरम्यान लखनऊ विद्यापीठ लखनऊ (उ.प्र.) आणि झेड एस आय गया (उ.प्र.) यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात येणाऱ्या ३६ व्या अखिल भारतीय प्राणिशास्त्र परिषद ''इनोव्हेशन्स इन लाइफ सायन्सेस फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट इन बायोडायव्हर्सिटी, एन्व्हायरमेंट, हेल्थ अँड फूड सिक्युरिटी'' या या विषयावर होत असून या परिषदेत त्यांना हा सन्मान बहाल करण्यात येणार आहे, लखनऊ विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागामध्ये होणाऱ्या उद्घाटन समारंभामध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानीत करण्यात येणार असल्याचे झेड. एस. आयच्या गया (बिहार ) येथील कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे . त्यांच्या या सन्मानाबद्दल ॲड. नारायण गोले पाटील, ॲड. पांडुरंग गोंडे,ॲड. तुळशीराम रेडे, रणजीत जाधव, विठ्ठल घोडके, राजाभाऊ पाष्टे, संभाजी पाष्टे, संभाजी चव्हाण, सुदर्शन हिवरकर, भगवान पवार, बापुराव वराडे, चैतन्य सोळंके, कृष्णा रासवे, विश्वनाथ ईके,दशरथ खेत्री,भागवत खेत्री, दत्ता वैराळ,राजाभाऊ दळवी, ज्ञानेश्वर पुरी आदींनी अभिनंदन केले.

# तेजस्वी होण्यासाठी स्वतःला सुर्यासारखं जाळून घ्यायला शिकलं पाहिजे -डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सूर्य बनने सोपे नाही आपल्याला सुर्यासारखं तेजस्वी व्हायचं असेल तर आधी स्वतःला सुर्यासारखं जाळून घेता आल पाहिजे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले. जिजाई इंग्लिश स्कुलच्या विज्ञान प्रदर्शनात ते उद्घाटक तथा प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.



यावेळी व्यासपीठावर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रमेश कदम, सचिव सुरेश कदम, सुशांत कदम, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शीतल मोरे, महावीर गोडभरले, हेमंत धानोरकर, आर डी जोगदंड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते माजी राष्ट्रपती तथा महान वैज्ञानिक एपीजे अब्दुल कलाम व शास्त्रज्ञ सी.व्ही.रमण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन व फीत कापून करण्यात आली. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी विज्ञान प्रदर्शन हे विद्यार्थ्यांना अनुभव समृद्ध शिक्षण देते. जगात झालेले विविध संशोधन, नवनिर्मिती याचा अभ्यास करून हे प्रयोग प्रदर्शित केले जातात. असे प्रदर्शन हे विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता वाढवतात त्यांच्यातील निरीक्षण क्षमता, सर्जनशीलता,

◀◀ पान ३ वर

# आजपासुन युसूफवडगाव येथे श्रीराम नवमी जन्मोत्सव व भव्य यात्रा महोत्सवास सुरुवात

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील गावचे ग्रामदैवत असलेले प्रभू श्रीराम यांच्या श्रीराम नवमी जन्मोत्सावाच्या निमित्ताने गावामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून सोबतच ३ दिवसांचा भव्ययात्रा महोत्सव आयोजिन करण्यात आलेला आहे.




श्रीरामचंद्र संस्थान रामवडगांव

युसूफवडगांव येथे अतिशय पुरातन श्रीराम मंदिर असुन अंदाजे येथे ३००/३५० वर्षापासुन श्रीराम नवमी जन्मोत्सव सोहळा व यात्रा महोत्सवाची परंपरा असुन या हि वर्षी श्रीराम नवमी जन्मोत्सव सोहळा व भव्य यात्रा महोत्सव असुन याची सुरुवात दि.६ एप्रिल पासुन होणार आहे.या दिवशी दु.१२ वा.रामजन्म सोहळा तद्नंतर मंदिरातुन पालखी सोहळा सुरू होईल. तर दु.२ मानाच्या १२ बैलगाड्या ओढण्याचा कार्यक्रम संपन्न होईल.७ एप्रिलला रात्री ठिक १२ वा मंदिरातुन छबिना मिरवणूक सुरूवात होईल छबिना मिरवणुक हनुमान मंदिरासमोर विसावल्यावर या ठिकाणी पहाटे ५ वा. पारंपारिक भारूडाचा कार्यक्रम व शोभेची दारु उडवण्याचा कार्यक्रम होईल दि.८ एप्रिलला दु.३ वा आमराई मध्ये भव्य कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे तसेच दि.६ एप्रिल रोजी संध्याकाळी शांताबाई जाधव यांचा तमाशाचा कार्यक्रम पण होणार आहे.तरी सर्व भाविकभक्तांनी श्रीराम नवमी जन्मोत्सव व भव्य यात्रा महोत्सवामध्ये सहभागी होण्याचे आवाहन सरपंच,उपसरपंच,सर्व ग्रा.प.सदस्य व समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# विनायकराव राठोड यांचे निधन

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील छोटेवाडी- रामनगर तांडा येथील माजी सरपंच विनायकराव मुन्नाभाऊ राठोड यांचे दि ०४ एप्रिल शुक्रवार रोजी रात्रौ ११:०० वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ६८ वर्ष होते. त्यांच्या पार्थिवावर दि. ०५ एप्रिल शनिवार रोजी सकाळी १०:०० वाजता रामनगर तांडा येथील त्यांच्या शेतमळ्यात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले,दोन मुली,सूना नातवंडे असा मोठा परिवार आहे. रामनगर तांडा येथील प्रगतशील शेतकरी,मदनराव राठोड,पवन राठोड यांचे ते वडील होत.



# मोठेवाडीत महादेव व पार्वतीचा विवाह सोहळा थाटात

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील मोठेवाडी येथील लहाना महादेव म्हणून प्रसिद्ध असलेल्या मंदीरात महादेव आणि पार्वती या देवांच्या लग्न सोहळ्याची रेलचेल पाहायला मिळाली. सकाळपासूनच वर व वधू कडील पाहुणे मंडळी लहाना महादेव मंदीरात सकाळपासूनच हजेरी लावत होती. वाजंत्री, मंगलाष्टके सारे काही एखाद्या खऱ्याखुऱ्या लग्नासारखे चित्र या ठिकाणी पाहायला मिळाले. हा लग्नसोहळा साजरा करण्याची परंपरा या गावात शेकडो वर्षापासून स्थानिक हिवरकर या कुटुंबियांनी जोपासली आहे. या लग्न सोहळयाचा मान हिवरकर परिवाराकडे आहे. अनादी काळापासून हा लग्नसोहळा मोठ्या



उत्साहात पार पडतो. यंदाही या लग्न सोहळयात मोठेवाडी परिसरातील भाविक उपस्थित होते. यां लग्न सोहळ्यात पुरोहित सुनील जोशी,तरुण तरुणी आणि महिलां मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. हा लग्नसोहळा मोठेवाडी येथील जागृत देवस्थान लहाना महादेव मंदिरात दरवर्षी चैत्र महिन्यातील अष्टमीला साजरा करण्यात येतो अशी माहिती या लग्न सोहळयाचे आयोजक महादेवराव हिवरकर यांनी दिली. या विवाह सोहळ्या प्रसंगी चक्रधर हिवरकर, शिल्पाताई नाथा यादव यांनी महाप्रसादाचे आयोजन केले होते. हा लग्न सोहळा यशस्वी करण्यासाठी सुदर्शन हिवरकर, चक्रधर हिवरकर, अमृत हिवरकर,अशोक रासवे,रामभाऊ गरड,विष्णु लेंडाळ यांच्या सह गावातील नागरिकांनी विशेष परिश्रम घेतले.

# दादेगाव येथे उद्या मंदारबुवा रामदास यांचे लळीत कीर्तन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील दादेगाव येथे रामनवमीनिमित्त श्रीराम जन्मोत्सव ३० मार्च ते ७ एप्रिल या कालावधीत धार्मिक सोहळा होत आहे.आष्टी तालुक्यातील दादेगाव येथे श्रीरामाचे प्राचीन मंदिर आहे.समर्थ रामदास स्वामी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या दादेगावात समर्थ शिष्य देवदासस्वामी यांची समाधी आहे.दादेगाव येथे श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्याची ३७७ वर्षाची परंपरा आहे.यावर्षी गुढी पाडव्यापासून या जन्मोत्सव कार्यक्रमास प्रारंभ झाला आहे.दि.३० मार्च ते ५ एप्रिल या कालावधीत मंदारबुवा रामदासी यांची दररोज ४ ते ७ या वेळेत संगीत श्रीराम कथा झाली.शनिवार दि.५ एप्रिल रोजी यात्रेनिमित्त सायंकाळी कावड,अश्व आणि छबिना मिरवणूक झाली.आज रविवार दि.६ एप्रिल रोजी ज्ञानेश्वर माऊली मुगगावकर यांचे रामनवमीनिमित्त राम जन्माचे कीर्तन होणार आहे. दुपारी कुस्त्याचा फड होईल. त्यानंतर सोमवार दि.७ एप्रिल रोजी मंदारबुवा रामदास यांच्या लळीत कीर्तनाने या उत्सवाची सांगता होणार आहे.या सर्व कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन दादेगाव ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे.



# स्पर्धा परीक्षेसाठी पालकांनी आपल्या पाल्यांना प्रोत्साहन द्यावे -शेख युनूस

**फ्लाईंग बड्‌र्सचा विद्यार्थी पालक मेळावा संपन्न**

माजलगाव । प्रतिनिधी

सध्या स्पर्धेचे युग असून प्रत्येक पालकाला वाटत असते माझा पाल्याने शाळेत चमकदार कामगिरी करून नाव लौकिक मिळवावा परंतु व्यस्त परिस्थितीत पालक आपल्या विद्यार्थ्यांसाठी तेवढा वेळ देण्यात कमी पडतात त्यामुळे साहजिकच अधिकचा ताण शिक्षक व शाळा व्यवस्थापनावर पडतो विद्यार्थ्यांकडून शाळा व्यवस्थापन तुम्हाला संधी उपलब्ध करून देईल अधिकचे तास घेण्यासाठी चांगले



शिक्षक देऊन अध्यापन व्यवस्थित करून घेईल विद्यार्थ्यावर वैयक्तिक लक्ष देईल परंतु आपण त्याचे पालक म्हणून आपल्या पाल्याच्या पाठीवर कौतुकाची थाप देणे गरजेचे आहे आपल्या विद्यार्थ्यांचे भावी जीवन उज्वल होण्यासाठी त्यास नवोदय व शिष्यवृत्ती सारख्या विविध स्पर्धा परीक्षेसाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे असे मत खोलेश्वर विद्यालय दिंद्रूडचे स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख शेख युनूस यांनी केले ते नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षेची पूर्वतयारी म्हणून पाचवी व सातवी विद्यार्थ्यासाठी आयोजित विद्यार्थी पालक मेळाव्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी फ्लाईंग बड्‌र्स अकॅडमीच्या

◀◀ पान ३ वर



# एस.एम.कुलकर्णी सेवानिवृत्त

माजलगाव । प्रतिनिधी

येथील पूर्णवादी बँकेचे शाखाधिकारी एस.एम.कुलकर्णी हे सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा शाखेच्या वतीने सत्कार करण्यात आला. एस.एम.कुलकर्णी यांनी २९ वर्षे बँकेत नौकरी केली या काळात त्यांनी माजलगाव , छत्रपती संभाजीनगर , परळी आदी शाखेत विविध पदावर काम केल्याचा त्यांना अनुभव होता. त्यांची एक वर्षापूर्वी माजलगाव शाखेचा शाखाधिकारीपदी निवड होऊन ते याच पदावर दि ३१ मार्च रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांचा माजलगाव शाखेच्या वतीने शाखाधिकारी तात्यासाहेब शेंडगे, महेश जाब्रस, मनीष नाईक, सचिन कुरूंदकर, अमोल कुलकर्णी, नरेश पोतरेकर, राजेश डौले, अशोक नाईक, परमेश्वर टेंभुर्णे व चेतक राठोड आदींनी त्यांचा सत्कार केला व पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# उपजिल्हाधिकारी कविता जाधव यांची सप्ताहला सदिच्छा भेट

**शिरूर । प्रतिनिधी**

**श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचा नांदेवली या गावांमध्ये चालू असलेल्या अखंड हरिनाम नारळी सप्ताहाला बीडच्या उपजिल्हाधिकारी श्रीमती कविता जाधव यांनी सदिच्छा भेट दिली असून वै. महंत स्वामी निगमानंद महाराज यांच्या प्रतिमेसमोर माथा टेकवून या ठिकाणी भाविक भक्तांसह ग्रामस्थांशी सप्ताह व परिसरातील अडीअडचणी बद्दल हितगुज केले आहे.**

शिरूर कासार तालुक्यातील मौजे नांदेवली या गावांमध्ये गेल्या चार दिवसापासून श्री क्षेत्र



मच्छिंद्रनाथ गडाचा ४७ वा फिरता नारळी सप्ताह भव्य स्वरूपामध्ये पार पडत आहे. या ठिकाणी बीड जिल्ह्यातील संत -महंत, त्याचबरोबर वारकरी संप्रदायातील दिग्गज मान्यवर, सामाजिक, शैक्षणिक,राजकीय, प्रशासनातील विविध अधिकारी कर्मचारी विविध क्षेत्रातील मान्यवर या ठिकाणी उपस्थिती लावून श्री मच्छिंद्रनाथाचे भक्त होऊन जात आहेत. शनिवार दि.५ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता बीडच्या उपजिल्हाधिकारी श्रीमती कविता जाधव यांनी नांदेवलीच्या सप्ताह सदिच्छा भेट दिली आहे. या भेटीदरम्यान त्यांनी नांदेवली ग्रामस्थांसह पंचक्रोशीतील भाविक भक्तांची हितगुज करून परिसरातील विविध समस्या अडचणी बद्दल हितगुज केले आहे. उपजिल्हाधिकारी श्रीमती कविता जाधव यांनी नांदेवलीच्या सप्ताहाला भेट दिल्याबद्दल महंत जनार्दन महाराज यांच्या उपस्थितीमध्ये ग्रामस्थांच्या वतीने सरपंच सौ. अयोध्या अंकुश शेळके यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

# हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथा सोहळ्याचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील नवनाथ नगर येथे सोळा वर्षापासून श्रीराम



नवमी सोहळा साजरा केला जातो निमित्त याहीवर्षी अखंड हरिनाम सप्ताह व श्री ह.भ. प.परमेश्वर महाराज फपाळ यांच्या वाणीतून दिनांक ०६ एप्रिल ते १२ एप्रिल पर्यंत शिवपुराण कथा होणार असून या कथेचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त नवनाथ नगर महिला मंडळ माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रति वर्षाप्रमाणे गेल्या सोळा वर्षापासून अखंड हरिनाम सप्ताह श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण तथा संगीत कथा प्रवक्ते श्री ह.भ.प.परमेश्वर महाराज फपाळ यांच्या सुश्राव्यवाणीतून कथा होणार आहे तसेच संगीत साथ शिथवादक व गायक एकनाथ महाराज कोंडवणे, तबला विशादक संदीप महाराज नरके यांची साथ लाभणार आहे व विष्णू सहस्त्रनाम नेतृत्व श्रीराम मुंदडा,ज्ञानेश्वरी नेतृत्व सौ.मीराताई डहाळे,शिवहर गायगवे यांचे असणार आहे या सप्ताहामध्ये दैनिक कार्यक्रम पुढील प्रमाणे सकाळी ०७:०० ते ०८:०० विष्णू सहस्त्रनाम,०८:०० ते ११:०० ज्ञानेश्वरी पारायण, ०१:०० ते ०४:०० वाजेपर्यंत नामास कीर्तन भजन,दि ०८ एप्रिल मंगळवार रोजी सुंदर कांड, ०५:०० ते ६:०० वाजेपर्यंत सामूहिक हरिपाठ महिला मंडळ नवनाथ नगर व तसेच रात्री ०७:०० ते १०:०० वाजेपर्यंत शिवपुराण कथा होईल तसेच या कथेची सांगता दि १२ एप्रिल शनिवार रोजी श्री.ह.भ. प.परमेश्वर महाराज फपाळ यांच्या काल्याच्या कीर्तनाने होईल व महाप्रसाद नरेंद्र प्रभाकर डुकरे यांच्या वतीने होईल तरी सर्व कार्यक्रमांचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन नवनाथ नगर महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# सोमेश्वरने एनएमएमएसमध्ये इतिहास घडवला

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**एनएमएमएस व सारथी शिष्यवृत्तीसाठी सोमेश्वर शैक्षणिक संकुलाचे सत्तावीस विद्यार्थी धारक झाले असुन त्यांना सुमारे चौदा लाख रुपयाची विक्रमी शिष्यवृत्ती मिळणार आहे.**

दोनशे सराव परीक्षा, उन्हाळी-दिवाळी सुट्यातील अखंड तास, दररोज घड्याळी तीन जादा तास, सेमिनार्सचे आयोजन, रात्र अभ्यासिका व सोमेश्वरसारथ्यांची कठोर परिश्रमासह बांधिलकीची फलनिष्पती म्हणजे सोमेश्वर शैक्षणिक संकुलातील सत्तावीस यशवंतांनी एनएमएमएस व सारथी शिष्यवृत्तीत मिळवलेले विक्रमी यश आहे. विशेष म्हणजे गुणवत्तेचे ज्ञानपीठ व सोमेश्वरप्रेमींचे तिर्थक्षेत्र अमृतमहोत्सवी सोमेश्वर शैक्षणिक संकुलाने एनएमएमएस व सारथी शिष्यवृत्तीत घाटनांदूर परिसरासह तालुक्यातुन सर्वाधिक आणि जिल्ह्यातुन



दुसऱ्या क्रमांकाचे यश मिळवुन विक्रम स्थापित केला आहे. सोमेश्वरचे मुंडे अर्पिता हरिहर, गित्ते प्रणिता गणपत, दौंड सिध्दिका महारुद्र, गाढवे प्राची काशिनाथ, दासूद समीर चंद्रशेखर, दहिफळे सार्थक शिवदास, जाधव यशराज इश्वर, शेख मतीन गणी, फड शिवम बाळू, गीते ओंकार दीपक, नाईक सोहम नितीन, पिंटूळे सोहम बाबुराव, घुले गोविंद अनंत, गायके अथर्व भरत आणि छानवाळ रुद्र दगडुसिंग असे एकुण पंधरा गुणवंत एनएमएमएस शिष्यवृत्तीचे मानकरी ठरले आहेत तर सोळंके नंदिनी परमेश्वर, साळुंके आदिती गुणवंत, जाधव अक्षरा शरद, जाधव श्रुती नवनाथ, जाधव ओवी चंद्रकांत, पाटील रणवीर रणजित, शिंदे पार्थ निवृत्ती, मुळे यश माणिक, वाकडे श्रेयस शिवाजी, तारसे श्रीपाद धोंडीराम, पठाडे प्रसाद एकनाथ व मोरे पुष्पराज लक्ष्मण असे बारा गुणवंत सारथी शिष्यवृत्तीचे मानकरी ठरले आहेत. गावकुसातील या गुणवंतांना सुमारे चौदा लाख रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार असल्याने यशवंतासह मार्गदर्शक शिक्षक श्रीमती एस.बी.पारेकर, आर.आर.पाटील, श्रीमती पी.के.मोरे, आर.एन.शिंदे, श्रीमती पी.पी.पाटील, श्रीमती व्ही.एम.चाटे, बी.एन.धुमाळ व डी.यु.चामे यांचे संस्थाध्यक्ष डॉ.उध्दव शिंदे, सचिव अजित देशमुख, उपाध्यक्ष महेश शेटे, कोषाध्यक्ष एस.जी.स्वामी, सहसचिव आर.आर.पाटील, प्राचार्य दि.ना.फड, मुख्याध्यापिका श्रीमती एस.के.जाधव, पर्यवेक्षक कृष्णा देशमुख, पर्यवेक्षिका श्रीमती एस.एस.नखाते, सर्व कर्मचारीवृंद व शिक्षणप्रेमींनी अभिनंदन केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

रविवार, दि.०६ एप्रिल २०२५ । पान ७

# मुख्यमंत्र्यांचा 'असंवेदनशील' शब्द मंगेशकर रुग्णालयाला लागला

## पण फडणवीस यांनी रुग्णालयाचे प्रशासन आणि विश्वस्त मंडळाचे अप्रत्यक्षपणे कान टोचले

**पुणे । प्रतिनिधी**

दीनानाथ मंगेशकर हे रुग्णालय लतादीदी आणि मंगेशकर परिवाराने खूप मेहनतीने उभारले आहे. हे रुग्णालय अत्यंत नावाजलेले आहे. या रुग्णालयात अनेक शस्त्रक्रिया आणि उपचार होतात. या रुग्णालयातील सगळ्याच गोष्टी चूक आहेत, असे म्हणता येणार नाही. कालचा प्रकार हा असंवेदनशील होता. जिथे चूक आहे, तिथे चूक म्हणावं लागेल, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (ऊर्शींशपवीर ऋरवपर्रींळी) यांनी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे प्रशासन आणि विश्वस्त मंडळाचे अप्रत्यक्षपणे कान टोचले.






दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला त्यांची चूक सुधारावी लागेल. ते ही चूक सुधारण्यासाठी प्रयत्न करणार असतील तर आम्हाला मला आनंद आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. जोपर्यंत मी नेमलेल्या समितीचा अहवाल येत नाही, तोपर्यंत याप्रकरणावर बोलणे योग्य ठरणार नाही. मात्र, रुग्णालयाबाहेर आंदोलन करणे योग्य नाही. सरकारने या घटनेची दखल घेतली आहे. दोषींवर कायदेशीर कारवाई केली जाईल. पण शो बाजी बंद झाली पाहिजे. घैसास यांच्या रुग्णालयाची झालेली तोडफोड समर्थनीय नाही. त्यामध्ये भाजपची महिला आघाडी सहभागी असेल तरी हे कृत्य चूक आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

तत्पूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी तनिषा भिसे यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी म्हटले. या प्रकरणात कारवाई केली जाणार आहे. मात्र, भविष्यात असे प्रकार घडू नयेत, यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. यासाठी एक एसओपी तयार करण्याचे काम सुरु आहे. या घटनेनंतर धर्मादाय आयुक्तांना नव्याने काही अधिकार देण्यात आले आहेत. भविष्यात त्यादृष्टीने कायद्यात बदल केला जाईल. संपूर्ण धर्मादाय व्यवस्था एका ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर यावी, हा आमचा प्रयत्न आहे. रुग्णालयात किती बेड आहेत, ते दिले जात आहेत की नाही, हे सगळं कळण्यासाठी व्यवस्थेत सुधारणा केल्या जातील. ही व्यवस्था मुख्यमंत्री आरोग्य कक्षाशी जोडण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. त्यामुळे आता याप्रकरणात पुढे काय कारवाई होणार, हे पाहावे लागेल.

# घरफोड्या करणारा परराज्यातील अट्टल चोर जेरबंद, २.१७ लाखांचा मुद्देमाल जप्त; आंबेगाव पोलिसांची कारवाई



**पुणे । प्रतिनिधी**

आंबेगाव पोलिसांनी परराज्यातील एका अट्टल घरफोडी चोराला अटक करून तीन गुन्ह्यांचा छडा लावला आहे. या कारवाईत आरोपीकडून २ लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. व्यंकटेश रमेश (वय २२, रा. कोथरुड, मूळ गाव बंगलोर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आंबेगाव बुद्रुक परिसरातील शिलाई वर्ल्डजवळ एका घरात घरफोडी झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणाचा तपास करताना पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध लावला. हा आरोपी मूळचा बंगलोरचा असून, कोथरुड येथील एका पेइंग गेस्ट (पीजी)मध्ये राहत होता. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतल्यानंतर त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून आंबेगाव, बावधान आणि लोणीकंद येथील घरफोडीच्या घटना उघडकीस आल्या असून, चोरीचा सर्व मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक मोहन कळमकर करत आहेत. ही कारवाई वरिष्ठ पोलिस निरीक्षक शरद झिने, उपनिरीक्षक मोहन कळमकर, पोलीस अंमलदार शेलेंद्र साठे, हनमंत मासाळ, चेतन गोरे, निलेश जमदाडे, धनाजी धोत्रे, प्रमोद भोसले, सुभाष मोरे, नितीन कातुर्डे, योगेश जगदाळे आणि समाधान कांबळे यांच्या पथकाने केली.

या पथकाने अचूक नियोजन आणि तपासाद्वारे आरोपीला जेरबंद करण्यात यश मिळवले. आंबेगाव पोलिसांच्या या कामगिरीमुळे परिसरातील घरफोडीच्या घटनांना आळा बसण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# भावासोबत अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून पत्नीचा खून; पतीला जन्मठेप

**पुणे । प्रतिनिधी**

भावासोबत अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून पोटात चाकू खुपसून पत्नीचा खून करणाऱ्याला जन्मठेप आणि ५ हजार रुपये दंडाची शिक्षा अतिरिक्त सत्र न्यायाधीश के.एन. शिंदे यांनी सुनावली. दंडाची रक्कम न भरल्यास ३ महिने अतिरिक्त कारावास भोगावा लागेल, असेही न्यायालयाने आदेशात म्हटले आहे.



राजू पुनाराम मिर्झा (वय ३०, रा. खांदवेनगर, वाघोली, मूळ. छत्तीसगढ) असे शिक्षा झालेल्याचे नाव आहे. पत्नी अनु (वय २८) हिचा खून केल्याप्रकरणी दीर राजेश (वय २२) याने लोणीकंद पोलिसात फिर्याद दिली आहे. ही घटना २३ ऑगस्ट २०२१ रोजी पहाटे ५ वाजता वाघोली येथे घडली. राजू आणि राजेश भाऊ आहेत. दोघे छत्तीसगढ येथून रोजगारासाठी पुणे येथे आले आहेत. राजू याचा अनु हिच्याशी प्रेम विवाह झाला होता. त्यांना तीन मुले आहेत. राजू मद्य प्राशन करून चारित्र्याच्या संशयावरून अनुला मारहाण करायचा. घटनेपूर्वी तीन महिने राजूने अनुला मारहाण करून घराबाहेर काढले. याबाबत तिने फोन करून राजेशला सांगितले.

त्यावेळी राजेशच्या सांगण्यावरून मुलाला घेऊन ती त्याच्याकडे राहायला गेली. त्यामुळेच भाऊ राजेशची अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून राजूने अनुचा खून केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या प्रकरणात सरकारी पक्षातर्फे विद्या जाधव यांनी काम पाहिले. लोणीकंद पोलीस स्टेशन गुन्हे शाखेचे तत्कालीन पोलीस निरीक्षक राजेश तटकरे यांनी या प्रकरणाचा तपास केला. न्यायालय पैरवी अधिकारी म्हणून प्रदीप कडूकर यांनी काम पाहिले. तर, हवालदार शुभांगी कुरंदळे यांनी न्यायालयीन कामकाजासाठी मदत केली.

# युवकास मारहाण प्रकरणी चौघांवर जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल

**बारामती । प्रतिनिधी**

येथील अहिल्यादेवी होळकर शासकीय वैदयकीय महाविद्यालयानजिक असलेल्या टी पॉईंट हॉटेलमधील कर्मचा-यास जबर मारहाण करणा-या तिघांवर बारामती तालुका पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.



या प्रकरणी हेमंत रतीलाल भिसे (रा. बारामती) हा कर्मचारी जबर जखमी झाला असून तालुका पोलिसांनी आदेश हर्षवर्धन लोंढे, आदित्य विकास लोंढे, अनिकेत सचिन शिंदे (तिघेही रा. लासुर्णे, ता. इंदापूर) मयूर अंकुश गायकवाड (रा. अंथुर्णे, ता. इंदापूर) या चौघांवर जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

ही मारहाण गुरुवारी (ता. ३) करण्यात आली. या बाबतची व्हिडीओ क्लिप शनिवारी व्हायरल झाल्यानंतर माध्यमांनी बातम्या दिल्यानंतर पोलिसांनी तातडीने हालचाल करुन चारही संशयितांना ताब्यात घेत कारवाई केली. या प्रकरणी जखमी हेमंत यांचे बंधू दीपक रतीलाल भिसे यांनी तालुका पोलिसात फिर्याद दिली आहे.

या मारहाणीची क्लिप व्हायरल झाल्यानंतर पोलिस फिर्यादीच्या फिर्यादीची प्रतिक्षा करत होते. शनिवारी माध्यमांनी या बाबत बातम्या दिल्यानंतर मात्र वरिष्ठांनीच यात लक्ष घालत तातडीने सूत्रे फिरवून चौघांनाही ताब्यात घेतले. या घटनेत वरिल चौघांनी हेमंत भिसे यात कुलूप, प्लॅस्टिकची बाटली, पट्टा, भांडे याने जबर मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. यात हात, पोटरी, डोक्याला जबर मार लागला असून हेमंत यास या घटनेने मोठा मानसिक धक्का बसला आहे.यामध्ये मारहाणीचे नेमके कारण अद्यापही स्पष्ट झालेले नाही. सदर व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर बारामतीत नागरिकाच संतापाची लाट उसळली होती, त्याची दखल घेत पोलिसांनी तातडीने सूत्रे फिरवीत चौघांना अटक केली.

# सुधारगृहाची भूमिका आली आळंदी देवस्थानच्या अंगलट; कर्मचार्याचा दारू पिऊन कार्यालयात

**आळंदी । प्रतिनिधी**




मुलगा गैरमार्गाला लागला आहे. त्याच्यात सुधारणा व्हावी म्हणून त्याला मंदिरात कर्मचारी म्हणून कामाला घ्या. चांगल्या संगतीत राहिला, तर त्यात सुधारणा होईल, अशा हेतूने पालकांच्या विनंतीवरून मुलाला मंदिरात देवस्थान व्यवस्थापनाने कामावर घेतले आणि त्याच मुलाने वारंवार वेगवेगळ्या विभागांत बदल्या केल्या जातात, या रागातून दारू पिऊन धारदार वस्तू घेऊन देवस्थान कार्यालयात राडा घातला.

सध्या मोठ्या प्रमाणात टीका होत असलेल्या या घटनेमुळे देवस्थान व्यवस्थापनाचा कारभार चव्हाट्यावर आला असून, अशी सुधारगृहाची भूमिका आळंदी देवस्थानच्या अंगलट आले आहे. ज्याला कुठे काम नाही, त्याला मंदिरात घेऊन त्यात सुधारणा करण्याच्या वृत्तीतून आत्तापर्यंत चार ते पाच जणांना देवस्थानने मंदिरात कामाला घेतले.

मात्र, त्यांच्यात सुधारणा तर दूर, वागण्यात देखील बदल न झाल्याने अखेर काही काळाने देवस्थान व्यवस्थापनाला त्यांना कायमस्वरूपी कामावरून काढून टाकावे लागले. मुळात चारित्र पडताळणी अहवाल असल्याशिवाय किरकोळ कामाला देखील मंदिरात कामगार नेमू नये, अशी मागणी आता वारकरी, भाविकांमधून होऊ लागली आहे.

दारू पिऊन राडा घालणार्या संबंधित तरुणाचा माफीनामा लिहून घेत त्याला पोलिस तक्रार न देता व्यवस्थापनाने सोडून दिले, हे त्या तरुणाच्या पुढील आयुष्यातील अडचणी न वाढण्यासाठी योग्यच होते. मात्र, पुन्हा कर्मचारी नेमताना विशेष काळजी घ्यावी, सर्व कर्मचार्यांचा चरित्र पडताळणी अहवाल घ्यावा, असा सूर आता भाविक आणि वारकर्यांमधून उमटत आहे.

# बिबट्याच्या हल्ल्यात युवा शेतकरी जखमी; आणे येथील घटना

**नारायणगाव । प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्याच्या पूर्व भागातील आणे येथील किरण दाते या युवा शेतकऱ्यावर बिबट्याने हल्ला केला असून त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्याला उपचारासाठी नारायणगाव येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

आणे येथील किरण तुळशीराम दाते (वय २५) हे आपल्या शेतातील मका पिकाला शनिवारी (दि. ५) दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास पाणी भरीत होते. यावेळी मक्याचा वाफा पूर्ण भरलाय का हे पाहायला जात असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक हल्ला करून किरण दाते यांच्या अंगावर झडप घेऊन डोक्याला गंभीर दुखापत केले. दरम्यान किरण दाते यांच्या हातामध्ये फावडे असल्यामुळे ते बिबट्याच्या हल्ल्यातून वाचले.

बिबट्याचा हल्ला झाल्यावर किरण दाते मका पिकाच्या बाहेर आले व माझ्यावर बिबट्याने हल्ला केलाय असे म्हणतआरडाओरड केला. त्यांचा आरडाओरडा ऐकून प्रशांत दाते, सुहास आहेर, जयराम दाते अजित आहेर प्रताप गवळी भाऊसाहेब आंद्रे कैलास दाते हे सगळे



मक्याच्या दिशेने पळाले. दाते यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचे संपूर्ण कपडे रक्ताने भिजले होते. दवाखान्यात आल्यावर सुहास आहेर यांनी स्वतःच्या अंगातील शर्ट दाते यांना घालायला दिले.

दरम्यान किरण दाते यांच्यावर नारायणगाव येथील ग्रामीण रुग्णालयात सध्या उपचार सुरू असून डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने मंचर येथील उपजिल्हा रुग्णालयात डोक्याला डोक्याला झालेल्या जखमा किती खोलवर आहे याची खातरजमा करून पुढील उपचार केले जाणार असल्याचे वैद्यकीय अधिकारी ऐश्वर्या सावरे यांनी सांगतले. दरम्यान वनक्षेत्रपाल लहू ठोकळ यांनी नारायणगाव या ठिकाणी जाऊन बिबट्याने हल्ला केलेल्या रुग्णांची विचारपूस केली. बिबट्या संदर्भात जनतेने सतर्क रहावे, शेतामध्ये काम करीत असताना हातामध्ये काठी तसेच मोबाईलमधील गाणी सुरू ठेवावीत जेणे करून आवाजाने बिबट्या पळून जाईल तसेच जर कुठे बिबट्या आढळला तर तात्काळ वन विभागाशी संपर्क साधावा, असे त्यांनी आवाहन केले आहे. ज्या ठिकाणी बिबट्याने हल्ला केला आहे त्या परिसरामध्ये तात्काळ पिंजरा लावण्याची व्यवस्था करण्यात येईल, असेही ठोकळ यांनी सांगितले.

# पुण्यात हनुमान चालिसाचा संगीतमय जागर: हनुमान जन्मोत्सवाच्या दिवशी होम-हवनाने सांगता

**पुणे । प्रतिनिधी**

जो शत बार पाठ कर कोई, छूटही बंदी महासुख होई, या तुलसीदासांच्या उक्तीला सार्थ ठरवत पुणेस्थित श्री सालासर हनुमानचालिसा मंडळ गेल्या १८ वर्षांपासून महाशिवरात्रीपासून हनुमान जन्मोत्सवापर्यंत संगीतमय हनुमान चालिसा पाठाचा भव्य उपक्रम राबवत आहे. आचार्य श्री गोविंदेवगिरी महाराज यांच्या प्रेरणेतून सुरू झालेल्या या धार्मिक सोहळयाला लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो. यंदा २६ फेब्रुवारी २०२५ रोजी महाशिवरात्रीपासून श्री भिकारदास मारुती मंदिरातून या उपक्रमाला सुरुवात झाली.



दररोज रात्री ९:३० वाजता सुरू होणाऱ्या या पाठात ११ वेळा विविध चालींमध्ये हनुमान चालिसा म्हटली जाते, त्यानंतर हनुमानजींची आरती आणि मंत्रपुष्पांजलीने कार्यक्रमाची सांगता होते. पुण्यातील दगडूशेठ हलवाई मंदिर, सारसबाग गणपती मंदिर, शंकर महाराज मठ, भाऊसाहेब रंगारी मंदिर, आंबा माता मंदिर, रोकडोबा मंदिर यासह अनेक मंदिरे, सोसायट्या आणि सार्वजनिक ठिकाणी हा उपक्रम उत्साहात साजरा होतो. दररोज ४०० ते ६०० भक्त या सोहळ्यात सहभागी होतात. समाजातील प्रतिष्ठित व्यक्तीही या भक्तीमय वातावरणाचा हिस्सा बनतात. या ४५ दिवसांच्या उपक्रमाची सांगता हनुमान जन्मोत्सवाच्या दिवशी गुरुवार पेठेतील मुरलीधर मंदिरात सायंकाळी ५ ते १० या वेळेत भव्य होम-हवनाने होणार आहे.

# विवाहितेचा छळ, सासरच्या पाच जणांविरोधात गुन्हा

**बारामती । प्रतिनिधी**

विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ करत तिच्यासह तिच्या वडिलांना बेदम मारहाण केल्याप्रकरणी सासरच्या पाच जणांविरोधात बारामती तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

याप्रकरणी विवाहितेपने (सध्या रा. पाहुणेवाडी, ता. बारामती) फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी शंकर हासपे, दत्तात्रय हासपे, बाळूबाई हासपे, संभाजी हासपे, गोरख हासपे (रा. मालुसरेवस्ती, बारामती) यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला.

फिर्यादीचा विवाह २०२३ मध्ये आत्याचा मुलगा असलेल्या शंकर याच्याशी झाला. लग्नानंतर काही दिवस तिला व्यवस्थित नांदविण्यात आले. परंतु त्यानंतर काही दिवसांनी फिर्यादी दिव्यांग असल्याने, तुझ्याकडून कोणतेही काम नीटपणे होत नाही, या कारणावरून तिला शिवीगाळ करत सतत अपमान केला जाऊ लागला.


ती सासरी नांदत असताना सासू व सासरे यांनी पती-पत्नीत भांडणे लावली. तिच्या व्यंगावर बोट ठेवून तिला छोट्या- मोठ्या कारणावरून मारहाण, शिवीगाळ करून उपाशीपोटी ठेवले जाऊ लागले. दीर संभाजीने दारू पिऊन घरी येत तुझ्या बापाने आम्हाला फसवले, आम्हाला तुझी गरज नाही, असे म्हणत शिवीगाळ केली. तसेच जिवे मारण्याची धमकी दिली.

सासरच्या अन्य मंडळींनी पतीला तिच्यासोबत भांडणे करायला लावली. दि. ७ मार्च रोजी पतीने तिला मारहाण केली. तिने ही बाब आई-वडिलांना सांगितल्यावर ते तिला नेण्यासाठी आले असताना दीराने व पतीने तिच्यासह तिच्या वडिलांना मारहाण केली. त्यात तिचे वडील जागीच बेशुद्ध पडले. अन्य लोकांनी भांडणे सोडवत तिच्या वडिलांना उपचारासाठी दाखल केले. त्यानंतर याप्रकरणी फिर्याद दाखल करण्यात आली.

# पुण्यात मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय; गुन्हे शाखेने छापा टाकून केली मोठी कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात गेल्या काही महिन्यापासून वेश्याव्यवसायावर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात येत आहे. अशातचं आता पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. मसाज पार्लरच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायावर गुन्हे शाखेने छापा टाकला आहे. कारवाईत पोलिसांनी पाच तरुणींना ताब्यात घेऊन त्यांची या दलदलीतून सुटका केली आहे. तर तरुणींना वेश्याव्यवसायास प्रवुत्त केल्याप्रकरणी मसाज पार्लरच्या व्यवस्थापकाला अटक केली आहे. नगर रस्त्यावरील चंदननगर भागात ही कारवाई करण्यात आली.



राहुल सुनील सिंह (वय २४, रा. समर्थ कॉम्प्लेक्स, मांजरी) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी सैबू शेख उर्फ सैबू मुबारक अली (रा. श्रीराम सोसायटी, चंदननगर) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे शाखेच्या युनिट पाचमधील पोलीस हवालदार स्वाती तुपे यांनी याबाबत चंदननगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, नगर रस्त्यावरील चंदननगर भागात इमारतीत मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट पाचच्या पथकाला गुरुवारी (३ एप्रिल) मिळाली. या माहितीची बनावट ग्राहक पाठवून खातरजमा करण्यात आली. नंतर पोलिसांच्या पथकाने येथे छापा टाकला. तेव्हा मसाज पार्लरमधून पाच तरुणींना ताब्यात घेतले. चौकशीत आरोपी राहुल आणि सैबू यांनी तरुणींना पैशांचे आमिष दाखवून वेश्याव्यवसायास प्रवृत्त केल्याची माहिती मिळाली.

पोलिसांनी राहुलला अटक केली आहे. त्याच्याबरोबर असलेल्या साथीदारावर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायद्यान्वये (पीटा) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर, मुलींची सुटका करून त्यांना रिमांड होममध्ये पाठविण्यात आले आहे. चंदननगर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षक सीमा ढाकणे अधिक तपास करत आहेत.